**सुविचार**

भगवान का बच्चा होने का अर्थ है- उनकी विशेषताओं को स्वयं में प्रत्यक्ष करना ।

(ब्रह्मकुमारीज)



विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/बुधवार दि. १७ एप्रिल २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१४१ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## इंडिया आघाडीतील नेत्यांमध्ये पंतप्रधान होण्याची क्षमता नाही



नवी दिल्ली : लोकसभा निवडणूक तीन दिवसांवर येऊन ठेपली आहे. येत्या १९ एप्रिल रोजी देशभरात पहिल्या टप्प्यातील मतदान होईल. पण, या निवडणुकीपूर्वीच पुढील पंतप्रधान कोण असेल, अशी देशभरात चर्चा सुरू आहे. अशातच, भारताचे माजी पंतप्रधान आणि कर्नाटकातील जेडीएसचे प्रमुख एचडी देवेगौडा यांनी एक मोठी भविष्यवाणी केली आहे.

सत्ताधारी भाजपचा पराभव करण्यासाठी विरोधकांनी स्थापन केलेल्या इंडिया आघाडीवर टीका करताना देवेगौडा म्हणतात, विरोधी पक्षातील कोणत्याही नेत्यात भारताचा पंतप्रधान होण्याची क्षमता नाही. नरेंद्र मोदीच देशाचे पंतप्रधान होऊ शकतात. पंतप्रधान पदासाठी नरेंद्र मोदी, हेच एकमेव पर्याय आहेत. नरेंद्र मोदी पुन्हा एकदा या देशाचे पंतप्रधान होतील, कारण संपूर्ण देशाचा त्यांना पाठिंबा आहे. जेडीएस आणि भाजप लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी एकत्र काम करतील.

कर्नाटकला २०० वर्षांत न्याय मिळाला नाही

कर्नाटकात काँग्रेसच्या न्याय देण्याच्या आश्वासनाचा खरपूस समाचार घेताना ते म्हणाले की, गेल्या २०० वर्षांपासून कर्नाटकाला न्याय मिळाला नाही. कावेरी पाणी वादाचा संदर्भ देत ते म्हणाले की, आता तो (पान ७ वर)

## यंदा देशभरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस

नवी दिल्ली - भारतीय हवामान विभागानं सोमवारी दीर्घकालीन हवामान अंदाज वर्तवला. त्यानुसार यंदा संपूर्ण देशभरात नैऋत्य मान्सूनच्या काळात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता असल्याची माहिती हवामान विभागाचे मुख्य संचालक डॉ. मृत्युंजय महापात्र यांनी पत्रकार परिषदेत दिली.

'एल निनो' आणि 'ला निना'मुळं निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा अंदाज घेऊन हवामान विभागानं हे दीर्घकालीन अंदाज जाहीर केले आहेत. एल निनो जाऊन ला निना येत असल्यानं त्याचा सकारात्मक परिणाम होणार असल्याचं ते म्हणाले.

हवामान विभागाकडं असलेल्या जवळपास ७० वर्षांच्या आकडेवारीचा सविस्तरपणे अभ्यास करून या निष्कर्षापर्यंत पोहोचल्याचंही महापात्र यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

त्यानुसार देशातील बहुतांश भागात म्हणजे जवळपास ७५ टक्क्यांपेक्षा अधिक भागामध्ये चांगल्या पावसाची शक्यता आहे. उत्तर, ईशान्य आणि पूर्वेतील काही राज्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. (पान ७ वर)

## युपीएससीमध्ये महाराष्ट्राचे घवघवीत यश १०० हून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण

नवी दिल्ली : केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. बिहारच्या शुभम कुमारने देशात पहिला येण्याचा मान मिळवला. या परीक्षेत महाराष्ट्रानेही आपली यशस्वी कामगिरी कायम ठेवली असून एकूण ७६१ उमेदवारांपैकी राज्यातील १०० हून अधिक उमदेवारांनी यश संपादन केले आहे. राज्यातून मृणाली जोशी हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे तर विनायक नरवाडे हा दूसऱ्या क्रमांकावर आहे. यूपीएससीतील गुणवत्ता यादीत या दोघांनी अनुक्रमे ३६ आणि ३७ वा क्रमांक पटकावला आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या २०२० सालच्या परीक्षेचा अंतिम निकाल शुक्रवारी जाहीर झाला. या निकालात पहिल्या १०० उमेदवारांमधे महाराष्ट्रातील ५ उमेदवारांचा समावेश आहे. यामध्ये मृणाली जोशी (३६), विनायक कारभारी नरवाडे (३७), रजत रविंद्र उभयकर(४९), जयंत नाहाटा (५६), विनायक महामुनी (९५) यांचा समावेश आहे.

राज्यातील इतर यशस्वी विद्यार्थी

लक्ष्य कुमार चौधरी (१३२), शुभम कुमार खंडेलवाल (१३३), रीचा कुलकर्णी (१३४), कमलकीशोर देशभुष खंडारकर (१३७), अवध सोमनाथ निवृत्त (१६६), अभिषेक खंडेलवाल (१६७), गौरव रविंद्र सांळुके, पार्थ कश्यप (१७४), प्रतिक अशोक धुमाळ (१८३), आशिष गंगवार(१८८), रीना प्रधान (१९४), नितीशा संजय जगताप (१९९), संचित गंगवार (२२२), तुषार उत्तम देसाई (२२४), प्रथमेश अरविंद राजेशिर्के (२३७), साहील खरे (२४३), संकेत बलवंत वाघे (२६६), मयुर खंडेलवाल (२८४) प्रवीण दराडे (३१२), आकाश चौधरी (३२२), आनंद पाटील (३२५), सचिन चौबे (३३४), श्रीकांत विसपुते (३३५), साहिल संगवान (३३६), दिव्या गुंडे (३३८), सुहास गाडे (३५०), सागर मिसाळ (३५३), सुरज गुंजाळ (५५४), अनिल म्हस्के (३६१), (पान ७ वर)

## भाजप म्हणजे भ्रष्टाचारी गोळा करणारा व्हॅक्यूम क्लिनर



मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विरोधी पक्षात कोणीही भ्रष्ट व्यक्ती असलेले अवडत नाही. त्यामुळे लगेच ते आपला व्हॅक्यूम क्लिनर फिरवतात व भ्रष्टाचा-यांना भाजपात घेतात, अशी उपरोधिक टीका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज केली. महाविकास आघाडी महाराष्ट्रात लोकसभेच्या सर्व ४८ जागा जिंकणार असा विश्वास व्यक्त करताना, भाजपाचा ४५ प्लसचा आकडा हा संपूर्ण देशाचा असल्याचा टोलाही त्यांनी लगावला.

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर मंगळवारी शिवसेना भवन येथे शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मशाल या अधिकृत चिन्हाच्या व नव्या गीताचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते अनावरण झाले. यावेळी खासदार संजय राऊत, शिवसेना नेते दिवाकर रावते, सुभाष देसाई, अरिंवद सावंत, उपनेते विनोद घोसाळकर, आमदार अजय चौधरी आदी नेतेमंडळी यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपावर जोरदार हल्ला चढवला. निवडणूक रोखे घोटाळ्यामुळे भाजपाचे बिंग फुटले आहे. हा जगातील सर्वात मोठा घोटाळा आहे.

माजी अर्थमंत्री निर्मला सितारामण यांच्या काळात ही योजना आणली गेली असेल. त्यामुळे (पान ७ वर)

## ४८ मतदारसंघात भाजपच्या १२५ पेक्षा जास्त सभा



मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी राज्यात सुरू झाली आहे. महाराष्ट्रात ५ टप्प्यात निवडणूक होणार आहे. त्यातील पहिल्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा १७ तारखेला थंडावतील. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी, यासह वंचित बहुजन आघाडीही रिंगणात उतरली आहे. त्यामुळे या चुरशीच्या लढाईत जास्तीत जास्त प्रचार सभा घेण्याकडे राजकीय पक्षांचा कल आहे. यात देवेंद्र फडणवीस यांच्या सभेसाठी महायुतीचे उमेदवार आग्रही आहे. त्यामुळे राज्यातील ४८ मतदारसंघात देवेंद्र फडणवीसांच्या १२५ हून अधिक सभांचे नियोजन करण्यात आले आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्या टप्प्यातील मतदारसंघात १५ एप्रिलपर्यंत १६ सभा घेतल्या आहेत. राज्यात निवडणुकीचा शेवटचा टप्पा २० मे रोजी होणार आहे. त्यामुळे येत्या महिना भरात फडणवीसांच्या प्रचारसभांचा धडाका असाच सुरू राहणार असल्याचे सांगण्यात येते. प्रत्येक पक्षाकडून प्रचारासाठी स्टार प्रचारकांची नियुक्ती केली जाते. त्यात केंद्रीय नेते, मंत्र्यांसह अनेकांचा समावेश असतो. मोदी-शाह यांच्यानंतर राज्यात देवेंद्र फडणवीसांच्या सभेसाठी उमेदवार आग्रही आहेत. फक्त भाजपाचे नाही तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवारांकडूनही फडणवीसांच्या प्रचाराची मागणी होत आहे.

देवेंद्र फडणवीस केंद्रस्थानी

राज्यात मागील काही वर्षापासून देवेंद्र फडणवीस हे केंद्रस्थानी आले आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणूक निकालानंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले. त्यामुळे देवेंद्र फडणवीसांच्या हातून मुख्यमंत्रिपद निसटले. उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेसने मिळून सर्वाधिक जागा निवडून आलेल्या भाजपाला विरोधी बाकांवर बसण्यास भाग पाडले. त्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी विरोधी पक्षनेते म्हणून जबाबदारी घेतली. त्यानंतर अवघ्या अडीच वर्षात राज्यात सत्तांतर घडले. या घडामोडींमागे देवेंद्र फडणवीसच असल्याचे बोलले गेले.

राज्यात आता २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची रंगत (पान ७ वर)

### गृहमंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्यावर आग

नवी दिल्ली : केंद्रीय गृह मंत्रालयाच्या दुस-या मजल्यावर मंगळवारी (१६ एप्रिल) सकाळी आग लागली. या आगीमुळे कार्यालयात एकच खळबळ उडाली. आग लागल्यानंतर अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली.

या घटनेबाबत अग्निशमन विभागाच्या अधिका-याने सांगितले की, आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाने सकाळी ९:३५ पर्यंत आग आटोक्यात आणली. ही आग गृह मंत्रालयाच्या कार्यालयातील आयसी विभागात दुस-या मजल्यावर लागली होती. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## लातूर ग्रामीणमधून भाजपला मताधिक्य देणार



लातूर दि. १५- पंतप्रधान नरेंद्रजी मोदी देशाला महासत्तेकडे घेवून जाण्याचे काम करीत आहेत. गेल्या दहा वर्षात देशहितासाठी आणि देशभरातील जनतेच्या विकासासाठी केलेल्या कामामुळे चारशे पार हा जनतेचा आवाज झाला आहे. चारशे पार भाजपाचा नव्हे तर जनतेचा नारा असून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना जिल्हयात सर्वाधिक मताधिक्य मिळावे यासाठी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी प्रचार यंत्रणा गतीमान करावी असे आवाहन राज्याचे युवक कल्याण व क्रिडामंत्री ना. संजय बनसोडे यांनी लातूर येथील महायुतीच्या मेळाव्यात बोलताना केले.

लातूर लोकसभा मतदार संघातील भाजपा महायुतीच्या प्रचारार्थ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई, रासप व मित्रपक्ष महायुतीचा मेळावा भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार रोजी लातूर येथील गिरवलकर मंगल कार्यालयात पार पडला. या मेळाव्यास राज्याचे युवक कल्याण व क्रिडा मंत्री ना. संजय बनसोडे, महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, जिल्हयाचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, शिक्षक आमदार विक्रम काळे, किसान मोर्चाचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य शिवाजीराव पाटील कव्हेकर, माजी आमदार गोविंदअण्णा केंद्रे, बब्रुवान खंदाडे, भाजपा नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, लातूर लोकसभा निवडणूक प्रभारी प्रा. किरण पाटील, शिवसेना संपर्क प्रमुख ॲड. बळवंत जाधव, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड. व्यंकटराव बेद्रे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष (पान ७ वर)

## स्टेट बँकेकडून जिल्हा बँकेला मागणीनुसार रोकड पुरवठा होत नसल्याने रोकडचा तुटवडा

### बँकेचे कार्यकारी संचालक हानमंत जाधव यांची माहिती

लातूर / प्रतिनिधी- लातूर जिल्हा बँकेमार्फत माध्यमिक शिक्षकांचे पगार, शेतकऱ्याची ऊस बिले, निराधार वाटप, पेन्शनर्स पगार, पीएम किसान, अनुदान वाटप, पीकविमा इ. चे वाटप केले जाते. बँकेस रोकड पुरवठा हा चेस्ट करन्सी मार्फत केला जातो. आपल्या जिल्ह्यात स्टेट बँक ऑफ इंडिया इतर बँकांना रोकड पुरवठा करते.

जिल्हा बँकेस दैनंदिन व्यवहारासाठी दररोज १५ कोटी रुपये रकमेची आवश्यकता असते. परंतु स्टेट बँकेमार्फत मागणीनुसार रोकड पुरवठा केला जात नाही. जिल्हा बँक इतर बँकांकडून स्वखर्चाने रोकड जमा करते व ग्राहकांच्या गरजा भागविते. माहे एप्रिल २४ मध्ये शिक्षकांचे पगार, निराधार, पेन्शनर्स पगार,शेतकऱ्याचे ऊसबिल हे एकाचवेळी जमा झाल्यामुळे अचानक मोठ्या प्रमाणात





रोकड रकमेची मागणी वाढली असुन मागील कांही दिवसापासून दैनिक रोकड मागणी वाढून रु.२५ कोटीवर गेलेली आहे. अचानक रोकड मागणीत झालेली वाढ व स्टेट बँकेकडून होत नसलेला पुरवठा यामुळे कांही प्रमाणात सध्या रोकड टंचाई भासत आहे. एका वृत्तपत्रात जिल्हा बँकेत पैशाचा तुटवडा अशी बातमी प्रकाशित झाली होती स्टेट बँक करन्सी कडून रोकड पुरवठा कमी होत असल्याने रोकड तुटवडा निर्माण झाला आहे . रोकड पुरवठा बाबत मा. जिल्हाधिकारी यांना जिल्हा बँकेकडून निवेदन स्टेट बँक चेस्ट करन्सी मार्फत लातूर जिल्हा बँकेस मागणीनुसार रोकड पुरवठा करण्यात यावा अशा आशयाचे निवेदन/विनंती पत्र जिल्हा बँकेमार्फत मा. जिल्हाधिकारी लातूर यांना दिलेले आहे. तसेच जिल्हा बँकेस स्टेट बँकेने मागणीनुसार रोकड पुरवठा अशा आशयाचे पत्र स्टेट बँकेस दिलेले आहे. त्याचबरोबर रिझर्व बँक ऑफ इंडिया, नागपूर यांनाही जिल्हा बँकेस मागणीनुसार रोकड पुरवठा करावा असे निवेदन दिलेले आहे. असे जिल्हा बँकेच्या वतीने प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

## संपूर्ण ताकदीनिशी डॉ शिवाजी काळगे यांना निवडून देण्याचा ग्रामस्थांचा निर्धार





लातुर प्रतिनिधी - देशातील सामान्य माणसाला दुःखातून बाहेर काढण्यासाठी, समाजातील भीतीचे वातावरण दूर करण्यासाठी, शेतमालाला हमीभाव देण्यासाठी, महागाई भरमसाठ वाढली ती कमी करण्यासाठी, उच्चशिक्षण घेऊन देखील बेरोजगार असलेल्या युवकांना रोजगार देण्यासाठी, महिला भगिनी सुरक्षित राहाव्यात यासाठी, कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे, ती सुधारण्यासाठी, मनरेगा अंतर्गत हाताला काम मिळावे यासाठी आपण डॉ. शिवाजी काळगे यांना निवडून द्यावे, असे आवाहन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले.

लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा मतदारांशी परिचय व्हावा यासाठी गेल्या कांही दिवसापासून लातुर लोकसभा मतदारसंघात सुसंवाद बैठका घेतल्या जात आहेत. लातुर विधानसभा मतदार संघातील वासनगाव येथे सोमवार दि. १५ एप्रिल रोजी सायंकाळी रमेश थोरमोटे पाटील यांच्या निवासस्थानी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संवाद बैठक घेण्यात आली यावेळी ते बोलत होते. या बैठकीला वासनगावसह परिसरातील जेष्ठ नागरिक, युवक उपस्थित होते.

यावेळी पूढे बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातुर लोकसभा निवडणुक २०२४ निमित्ताने आपण वासनगाव याठिकाणी डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ आपण एकमेकांशी संवाद साधण्यासाठी एकत्र आलेलो आहोत. वासनगाव हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला असून आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या हृदयाजवळील हे गाव असून या ठिकाणी आल्यानंतर आपल्या घरी असल्याचे वाटते असे सांगीतले. यावेळी पूढे बोलतांना म्हणाले, लातुर लोकसभेचे तत्कालीन खासदार मतदार संघात सोडा, सभागृहात तरी कधी आले की नाही? कधी सर्वसामान्यांचे प्रश्न मांडले की नाही? अशी शंकाच आहे. सदया आपल्याला सामान्य माणसाला दुःखातून बाहेर काढण्यासाठी, भीतीचे वातावरण दूर करण्यासाठी, शेतमालाला भाव देण्यासाठी, महागाई भरमसाठ वाढली ती कमी करण्यासाठी, उच्चशिक्षण घेऊन देखील बेरोजगार असलेल्या युवकांना रोजगार देण्यासाठी, महिला भगिनी सुरक्षित राहाव्यात यासाठी, कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे, ती सुधारण्यासाठी, मनरेगा अंतर्गत हाताला काम मिळावे यासाठी आपण डॉ. शिवाजी काळगे यांना निवडून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. आज देशात (पान ७ वर)





## मतदानाचा नवा लातूर पॅटर्न निर्माण करणार

लातूर, दि. १५ : लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवून या क्षेत्रातही नवा लातूर पॅटर्न निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. यासाठी लातूर जिल्ह्यातील विविध व्यापारी संघटना, असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेवून आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जिल्हातील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीप कक्षाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत लातूर जिल्ह्यातील लातूर जिल्हा ट्रव्हल्स असोसिऐशन, डॉक्टर्स, पॅथालॉजी, व्यापारी, ऑटोरिक्षा चालक, लघुउद्योग यासह विविध व्यापारी संघटना, असोसिएशनच्या पदाधिकारी, प्रतिनिधींशी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी संवाद साधला. तसेच प्रत्येके असोसिएशनच्यावतीने अभिनव कल्पना राबवत मतदान वाढीसाठी पर्यंत करण्याचे आवाहन त्यांनी केले. स्वीप उपक्रमांतर्गत मतदार जागृतीसाठी या सुसंवाद बैठकीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात करण्यात आले होते. यावेळी सर्वांना मतदानाची शपथ देण्यात आली.

सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रियांका आयरे, स्वीपचे नोडल अधिकारी रामदास कोकरे व नागेश मापारी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हनमंत वडगावे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक केशव राऊत यांची यावेळी उपस्थिती होती.

लातूर पॅटर्नची शैक्षणिक क्षेत्रातील ओळख ही सर्वशृत आहे. मतदानामध्येही लातूरचा नवा पॅटर्न तयार करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी सुमारे ६२ टक्के होती. यावेळी सर्वाधिक मतदानाची टक्केवारी लातूर जिल्ह्यात असावी, यासाठी (पान ७ वर)

दैनिक यशवंत
बुधवार दि.१७ एप्रिल २०२४
२
अहमदपूर/चाकूर परिसर
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

## गंगाहिप्परगा येथे भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

अहमदपूर दि.१६(कारामुंगीकर) येथुन जवळच असलेल्या गंगाहिप्परगा येथे भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना १३३ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, ग्रामपंचायत गंगाहिप्परगा येथील व सार्वजनिक जयंती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. सुरूवातीला ग्रा.पं.कार्यलया मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच सौ.मिनाताई कोमले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण आला. या प्रसंगी ग्रामविस्तारधिकारी मोहन केंद्रे, बाजीराव कदम, तुकाराम कदम,संजय भालेराव, बाबुराव देवकते,गुलाम शेख,त्रिभवन काडवदे, ज्ञानोबा मदने, सुखदेव भालेराव,माधव कांबळे, गंगाधर गायकवाड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. तसेच सरपंच सौ.मिनाताई कोमले व माजी सरपंच सुखदेवराव कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तसेच त्रिशरण,पंचशील संजय भालेराव,ममता भालेराव यांनी घेतले. ग्रा.पं.माजी सदस्य प्रताप फाजगे, लातूर पोलीस पवन सुरकुटे,तानाजी शेकापुरे, सुनिल कोमले, बारूळे, महेश मदने,किरण चामवाड आदींची उपस्थिती होती. यावेळी व्यंकट कदम यांनी मनोगत व्यक्त केले तसेच जयंती मंडळाचे सर्व पदाधिकारी नवनाथ भालेराव, राहुल जोंधळे, अर्जुन व्हावळे,किशन भालेराव, मोतीराम कांबळे, आकाश ढवळे,नवनाथ मस्के, प्रविण गायकवाड,चंदू भालेराव, ग्रा.पं.सदस्य विश्वनाथ भालेराव,ज्ञानाबा गवळे, गोविंद वाघमारे, ह्या सर्वांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती.

# वृद्ध असो किंवा जवान, सर्वजन करा अवश्य मतदान

अहमदपूर दि.१६(कारामुंगीकर) वृद्ध असो किंवा जवान, सर्वजन करा अवश्य मतदान असा संदेशा स्वीप पथकाच्या माध्यमातुन देत मतदानजनजागृती करण्यात आली.



याबाबत अधिक माहिती अशी की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी पारंपारिक लोकगीतांच्या माध्यमातून थोडगा गावा-तील सुजान नव मतदार व वृद्ध मतदार बंधूने शंभर टक्के मतदान करण्यासाठी दि.१५ रोजी सायंकाळी पथकाद्वारे जाहीर आवाहन करण्यात आले.

मवृद्ध असो किंवा जवान, सर्वजन करा अवश्य मतदान.फ या घोषणेने
तसेच प्रबोधात्मक लोकगीतातून लातूर लोकसभा मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढवा यासाठी जनजागृती करण्यात आली.

या अभियानांसाठी जिल्हाधिकारी वर्षा घु-गे-ठाकुर मॅडम सहाय्यक निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे,अहमदपूर चे तहसीलदार शिवाजी पालेपाड,चाकूर चे तहसीलदार नरसिंग जाधव, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे,जयसिह जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघात स्वीप पथक जनजागृती करत आहे.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वीपचे सदस्य राज्यपुरस्कार प्राप्त कला शिक्षक महादेव खळुरे,शिवकुमार गुळवे,मोहन तेलंगे,नागनाथ स्वामी,बस्वेश्वर थोटे,श्रीमती अर्चना माने थोडगा येथिल तलाठी प्रियंका पवार ,पो-लीस पाटील पवन केंद्रे,शरद मुंढे,व्यंकट मुंढे,मधुकर करले,मारोती तरडे, सह शिक्षक सीताराम यंचेवाड गा-वातील मतदार बंधू भगिणिनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाला उपस्थितीत होते.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्तविक नागनाथ स्वामी तर आभार महादेव खळुरे यांनी मानले. यावेळी गावातील ना-गरीक उपस्थित होते.

# डोक्यात भीमराय आणि हृदयात शिवराय असल्याशिवाय माणूस घडत नाही- डॉ. सतीश ससाणे

अहमदपूर दि.१६(कारामुंगीकर) आजच्या धकाधकीच्या काळात मानवी मूल्ये हरवत चालली असून, युवापिढी भरकटत आहे. म्हणून या काळात डोक्यात भीमराय आणि हृदयात शिवराय असल्याशिवाय माणूस घडत नाही, असे प्रतिपादन महात्मा फुले महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश ससाणे यांनी केले.




याबाबतचे सविस्तर वृत्त असे की , अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, समीक्षक तथा ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील हे होते. यावेळी पुढे बोलतांना डॉ. सतीश ससाणे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य हेच राज्यघटना लिहिताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुढील आदर्श राज्य होते. स्वराज्याची प्रतिकृतीच त्यांनी राज्यघटनेतून निर्माण केली आहे, असेही ते यावेळी म्हणा-ले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. वसंत बिराद-ार पाटील म्हणाले की, सर्व महामानव हे अखिल मानव जातीचे असतात; मात्र राजकीय लोकांनी आपल्या स्वार्थासाठी त्यांना जाती जातीत बंदिस्त केले. या महामानवांना समजून घेण्यासाठी त्यांचे विचार वाचले पाहिजेत आणि स्वतःच्या उद्धाराबरोबरच देशाचाही उद्धार केला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे कैवारी नव्हते तर ते राष्ट्राचे निर्माते होते, असेही ते यावेळी पुढे बोलताना म्हणाले.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग चिलगर यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. बब्रुवान मोरे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# खा.सुधाकर शृंगारेला मत म्हणजे विकासाला मत-प्रदेश प्रवक्ते गणेश हाके

अहमदपूर दि.१६ (प्रतिनिधी) सुधाकर शृंगारेला मत म्हणजे विकासाला मत असल्याचे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके पाटील यांनी केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, भारतीय जनता पार्टीचे महायुतीचे उमेदवार सुधाकर शृंगारे यांना मत म्हणजे विकासाला मत असे मत भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्राचे प्रवक्ते तथा अहमदपूर विधानसभा निवडणुक प्रमुख गणेश दादा हाके पाटील यांनी येथे व्यक्त केले आहे.

गेल्या दहा वर्षात देशाचा ज्या गतीने विकास झालेला आहे या विकासामुळे देशाची प्रतिमा व जगातील उंची वाढलेली आहे आज देश एक समृद्ध राष्ट्र निर्भीड राष्ट्र व आर्थिक विकासाकडे झिपावणारा राष्ट्र अशी प्रतिमा जगात निर्माण झाली आहे हा लौकिक भारताने गेल्या दहा वर्षात कमावलेला असून देशाचे लाडके पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली देशात सर्वच क्षेत्रात झालेला विकास होय असे मत गणेश हाके यांनी यावेळी व्यक्त केले. सबका साथ सबका विकास सबका प्रयास व सबका विश्वास या धरतीवरती सगळ्यांना बरोबर



घेऊन सगळ्यांचा विश्वास प्राप्त करून सगळ्यांच्या प्रयत्नाने माननीय मोदी साहेबांनी आपल्या देशाचा विकास केला आहे येत्या निवडणुकीतही आपल्याला देशाचा विकास हवा असेल तर माननीय मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार देशात येणे गरजेचे आहे त्यासाठी लातूरचा खासदार म्हणजे सुधाकरराव शृंगारे यांना मत म्हणजे देशाच्या विकासाला मत आहे म्हणून ला-तूर लोकसभा मतदारसंघातील जनतेने कोणत्याही खोट्या आफवानां बळी न पडता फुकटची आश्वासने देऊन काँग्रेस मत मागत आहे. सांगण्यासारखे त्यांच्याकडे काहीच नाही कारण काँग्रेसचे कारकीर्द ही भ्रष्टाचार आणि बडबडली होती त्यामुळे विकासावरती काँग्रेस कधीच बोलत नाही जात पात धर्म यावरती मत मागून काँग्रेसने अनेक वर्ष या देशात सत्ता केली परंतु आता या देशातील जनता जागृत झालेली आहे.

चांगलं वाईट ओळखायला लागलेली आहे आणि म्हणूनच दहा वर्ष माननीय नरेंद्र मोदी यांना देशाने सत्ता सोपविली होती म्हणून ला-तूर लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी सुधाकर शृंगारे यांना प्रचंड मताने निवडून देऊन देशाच्या विकासात आपला-ही वाटा ,सहभाग द्यावा असे आव्हान गणेश हाके यांनी केले आहे.

## आयुष्य

आयुष्य ही निसर्गाची देण
सुंदर जीवनाचा साथी
आयुष्य सुंदरता ही
निरोगी जीवनाचा आधार
समाजात वावरल्यावरच
आयुष्याचा अर्थ कळतो
जगातील चांगली वाईट
माणसेही कळतात अनुभवातुन
परंतु मी पणा सोडुन
आयुष्य जगताना आनंद मिळतो
स्वतःला आणि देतो
दुसऱ्यांनाही
मिळालेले आयुष्य कष्ट करुन
जगायच असतं..
तेच खरे आयुष्य असते..
स्वतःच्या पायावर उभे राहुन
परिश्रमाने आयुष्य जगायचे
आयुष्यामध्ये त्रास सहन करुनच
सर्वकाही प्राप्त करता येते
दुःखाला पायदळी तुडवुन
कष्ट करुन आनंदी आयुष्य
जगुया, आनंदी आयुष्य
जगुया.. आनंदी आयुष्य जगुया



मंडले पायल धनराज
७२४९६१८८९७

# डॉ. वैभवी तत्तापुरे यांना दीक्षांत सोहळ्यात एम.बी.बी.एस. पदवी प्रदान

अहमदपूर दि.१६ (कारामुंगीकर) डॉ. वैभवी तत्तापुरे यांना दीक्षांत सोहळ्यात एम बी बी एस ची पदवी प्रदान करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजी नगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र सभागृहात सन २०१८ च्या शिवरत्न बच ची डॉक्टर वैभवी रामलिंग तत्तापूरे हिला महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉक्टर शिवाजीराव सुक्रे यांच्या हस्ते दीक्षांत सोहळ्यात एम बी बी एस ची पदवी प्रधान करण्यात आली.




यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विभागी यआयुक्त डॉ. भास्कर मुंडे, महाविद्यालयाचे उप अधिष्ठाता डॉक्टर एम एस बेग, उप अधिष्ठाता डॉक्टर प्रसाद देशपांडे, वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर सुरेश हरबडे यांच्या सह मान्यवरांची उपस्थिती होती.

डॉ .वैभवी तत्तापूरे ही यशवंत विद्यालयाचे पर्यवेक्षक राम तत्तापूरे आणि संत ज्ञानेश्वर विद्यालयाच्या मुख्याध्यापक आशा रोडगे यांची कन्या आहे.

या नेतृदिपक यशा बद्दल वीर मठ संस्थांनचे मठाधिपती परमपूज्य राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज, आचार्य गुरुराज स्वामी, टागोर शिक्षण संस्थेचे सचिव शिक्षण महर्षी डी बी लोहारे गुरुजी, अध्यक्ष डॉक्टर अशोक सांगवीकर, गणेश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गणेश दादा हाके पाटील, सचिव प्राचार्य रेखा तरडे, आमदार बाबासाहेब पाटील, माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी मंत्री विनायकराव पाटील, माजी आमदार बब्रुवाहन खंदाडे, शिवकुमार सोनटक्के, ओम भाऊ पुणे यांच्यासह मित्रपरिवारानी अभिनंदन आणि कौतुक केले आहे.

# डॉ. ए.पी.जे.प्री-प्रायमरी इटंरनॅशल स्कूल येथे पहिला वर्धापन दिन व गुणगौरव सोहळा संपन्न

अहमदपूर दि.१६(कारामुंगीकर) डॉ. ए.पी.जे.प्री-प्रायमरी इटंरनॅशल स्कूल तळोजा येथे पहिला वर्धापन दिन व गुणगौरव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ. ए.पी. जे.प्री-प्रायमरी इटंरनॅशल स्कूल तळोजा नवी मुंबई येथे पहिला वर्धापन दिन व विद्या-र्थी गुणगौरव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमाणित समुपदेशक व व्यावसायिक प्रशिक्षक प्रा. हेमंत परब हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर यावेळी माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक एस. के. तादलापूरकर, रयत बँकेचे संचालक किशोर पाटील, ॲड. अशोक पोटे, विजय पाटील, प्रा. प्रविण मोरे, सृष्टी मोरे, प्रा. राम गुडमे आदींची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती.




वर्धापन दिनानिमित्त व शाळेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यासाठी डॉ. दत्तात्रय आगदे, स्टारमेकर वरील सुप्रसिद्ध गायीका सौ. गंगासागर तादलापूरकर, ॲड. विठ्ठल गडीकर, ॲड प्रशांत तादलापूरकर, प्रा. डॉ. रमेश करडे, प्राचार्य डॉ. रा-हुल डोंगरगावकर, महात्मा फुले सामाजिक परिवर्तन संस्थेचे संचालक तथा डॉ. ए. पि. जे. अब्दुल कलाम इंटरनॅशनल स्कूल चे सी. ई. ओ.अन्तेश गवळी, संचालक सुनील बोइ-वार , ॲड. राजेश मोतेवाड, राजेंद्र माने, राज्य समन्वयक म.प्रा.शि.प. मुंबई, प्राचार्य रमेश सोनकांबळे, प्रा.पद्माकर कांबळे, आदर्श लाईव्ह न्यूज. चॅनेलचे मुख्य संपादक अक्षय कांबळे, विजय माने, वसंत जाधव, दिलीप जाधव, शाहीर चंपत गवाले, बालाजी करडे, फारुख नगरकर, भीम चव्हाण, नवनाथ जाधव, विलास करडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात मुलानी नृत्य, भाषणे व विविध कला प्रदर्शनाचे सादरीकरण करण्यात आले. वर्षभरात विविध कलागुणांमध्ये भाग घेतलेल्या व शैक्षणिक अभ्यासक्रम मध्ये प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुलांच्या उज्वल भविष्यासाठी व दर्जेदार शिक्षण मुलांना देण्यासाठी सिडको मारवा मध्ये डॉ. ए. पि. जे. प्रि-प्रायमरी इंटर नॅशनल स्कूल ची स्थाप-ना करण्यात आली. व एका वर्षात शाळेतील मुलांची प्रगती वाखाणण्याजोगी असल्याचे पालक ॲड. अशोक पोटे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

विद्यार्थी केंद्रित शिक्षण, अनुभवी शिक्षक, मुलासाठी स्वतंत्र वर्ग खोली, सुसज्ज बैठक व्यवस्था, शुद्ध पिण्याचे पाणी, Activity base learn-ing, डान्स, कराटे, संगीत, चेस, कॅरम इत्यादी सुविधांनी परिपूर्ण असलेल्या या शाळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्याबरोबर इतरही ॲक्टिव्हिटी मोफत दिल्या जातात. या आधुनिक तंत्रज्ञानयुक्त शिक्षणामुळे मुलामध्ये बदल दिसून येत असल्याचे अनेक पालकानी आपले मत व्यक्त केले आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. हेमंत परब यांनी पालकांना दररोज जीवनात अवलंब करावयाच्या सात सवई तसेच पालक आणि मुले या समोरील प्रमुख आव्हाने, पालकांचे प्रमुख कर्तव्य आणि जबाबदारी, वर्तणुकीच्या समस्या व उपाय, करिअर व भवितव्य या बाबतीत जागरुकता इत्यादी बाबीवर आपले मत मांडले व पालकांचे मने जिंकली.

वर्षभरात मुलांच्या सर्वागीण विकासासाठी शाळेच्या व्यवस्थापन समितीतील पदाधिकारी, सौ. शांतीश्री भेंडेगावकर, श्रीपती वाघमारे, रघुनाथ वाघमारे, सदाशिव वाघमारे, सरस्वती वाघमारे, शाळेच्या मुख्याध्यापिका आफरा नगरकर, शिक्षिका संजीवनी तांदळे, कांचन बांगर, कोमल मोरे, प्रियंका दांगट, सीमा नेहे ,हिमा जयचंद्रन व शिपाई नम्रता आडे , सोनल चक्रनारायण इत्यादी कर्मचारी यांनी खुप मेहनत घेतली आहे.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संजीवनी तांदळे व हिमा जयचंद्रन यांनी केले असून कांचन बांगर यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी पालक विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अनुयायांनी १००० पुस्तके केली अर्पण

## सम्राट मित्र मंडळाच्या आवाहनाला प्रतिसाद

अहमदपूर दि.१६ (कारामुंगीकर) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अनुयायांनी १००० पुस्तके अर्पण केली असुन येथील सम्राट मित्र मंडळाच्या आवाहनाला भरभरुन प्रतिसाद मिळाला आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की, भार-तरत्न बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने भीम अनुयायांनी तब्बल १००० पुस्तके दिवसभरामध्ये बाबासाहेबांच्या अभिमानाच्या निमित्ताने अर्पण करून अनोख्या पद्धतीने अभिवादन केले आहे येथील सम्राट मित्र मंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने पुष्प ,मेणबत्ती ,पुष्पहार च्या माध्यमातून पुतळ्यापाशी येऊन आपण प्रत्येक वर्षी अभिवादन करतो मात्र यंदा हे अभिवादन करत असताना सोबत पुस्तक कुठल्याही ज्ञानाचे पुस्तक प्रज्ञा सूर्य असणाऱ्या बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यापाशी अर्पण करावे यातून जमा होणारी पुस्तके हे वाचनालयाला देऊन वाचन संस्कृती वृद्धिंगत होईल यासाठी भीमसैनिक आणि पुढाकार घ्यावा असे आवाहन सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले होते या आवाहनाला भरभरून असा प्रतिसाद मिळाला आज दिवसभरामध्ये सामाजिक राजकीय शैक्षणिक व्यावसायिक पत्रकार आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी येथे बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करत असताना पुष्पहार मेणबत्ती याशिवाय सोबत एक दोन पुस्तके सुद्धा त्यांनी आण-लेली होती पुस्तके देऊन अनोख्या पद्धतीने त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती दिनी अभिवादन केले आहे या अनोख्या अशा उपक्रमाच्या समाजातील सर्वच स्तरातून कौतुक होत असून या ठिकाणी माजी मंत्री बाळासाहेब जाधव माजी आमदार तथा पुतळा समितीचे अध्यक्ष बब्रुवानजी खंदाडे भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपरावजी देशमुख प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील,माजी पंचायत समिती सभापती अयोध्याताई केंद्रे,माजी नगराध्यक्षा सरस्वती कांबळे आंबेडकरी चळवळीची ज्येष्ठ नेते युवक नेते श्रीकांत जी बनसोडे महेंद्र भाऊ ससाने अरुण भाऊ वाघंबर ,पत्रकार शिवाजीराव गायकवाड, पत्रकार अजय भालेराव, पत्रकार गणेश मुंडे, पत्रकार भिमराव कांबळे ,आदी सह असंख्यजणांनी सामाजिक कार्यकर्ते खुरामखान पठाण आदी जणांनी या ठिकाणी भेटी देऊन भरभरू प्रतिसाद दिला आहे

या प्रसंगी बालाजी थिट्टे, सिध्द-ार्थ वाघमारे, अनिल तिगोटे, सुनिल तिगोटे, संविधान कदम, रवि बनसोडे, संभाजी जाभाडे, अभिजित सोनकांबळे, सिद्धार्थ (डॉन )वाघमारे, सतीश कदम, अनिल वाघमारे, सावळाराम बनसोडे, सुनील गायकवाड, मिलिंद कदम, दिलीप सोनकांबळे, सोनू कांबळे, सुनील तिगोटे, रोहिदास तिगोटे, सुशील कदम, राजू गूळवे, अभिषेक ससाणे, विठ्ठल ससाणे, सुनील ससाणे, राजवीर मतकर, राहुल वाघमारे, अजय भलेराव, पुंडलिक सनकांबळे, दिनेश तिगोटे, राजधानी सोनकांबळे, सुरेश बनसोडे, रायभोळे रितेश, शुभम नावंदे, विशाल वाघमारे, साईनाथ कांबळे, आकाश वाघमारे, जय गुळवे,अभय गुळवे, सुमित बनसोडे, सिद्धार्थ लांडगे, सतीश बनसोडे, विशाल शिंदे, रा-हुल कांबळे, सुशील नवरंगे, सोनू सोनकांबळे, सुरज सोनकांबळे, सुजल सोनकांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यशवंत
धाराशिव जिल्हा
बुधवार दि. १७ एप्रिल २०२४
३
☎कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## रेश्मा भाभींनी दिली ठाणे माहिती कार्यालयास भेट

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे स्वच्छता काम करणाऱ्या रेश्मा भाभी, त्यांचे पती सरताज आणि त्यांची छोटी मुलगी आलिशा यांनी ठाणे येथील जिल्हा माहिती कार्यालयास दि.१५ एप्रिल रोजी सदिच्छा भेट दिली.

आलिशा आणि ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी मनोज सानप यांचे आलिशा तान्हे बाळ असल्यापासूनच ऋणानुबंध जुळले आहेत. ती खूप हुशार, चुणचुणीत मुलगी आहे. तिच्या हृदयाला छिद्र असून त्या ऑपरेशनसाठी ते नवी मुंबईत आले होते. विशेष म्हणजे अशा परिस्थितीत त्यांनी सानप यांच्यासाठी खास उस्मानचे गुलाबजाम नेले होते. त्यामुळे सानप देखील त्या कुटुंबाप्रती भावूक झाले होते.



# खासदार राजेनिंबाळकर यांचा प्रचंड शक्ती प्रदर्शनामध्ये उमेदवारी अर्ज दाखल

## आदित्य ठाकरे, आ. अमित देशमुख, आ. रोहित पवार यांची उपस्थिती

## रखरखत्या उन्हात कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला


(छाया-राहुल कोरे)

### अब की बार, भाजपा तडीपार - आदित्य ठाकरे



भाजपा सरकारने दुष्काळ, अवकाळी, गारपिटीमध्ये झालेल्या नुकसानीची शेतकर्यांना भरपाई दिली नाही. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांचय काळात शेतकर्यांना तातडीने भरपाई दिली. म्हणून आता 'अब की बार, भाजपा तडीपार' हे निश्चित आहे. धाराशिव लोकसभा मतदारसंघात पुन्हा ओमराजे हेच खासदार होणार आहेत. पुन्हा महाविकास आघाडीचं सरकार आणायचं आहे. धाराशिवसोबत महाराष्ट्राला, दिल्लीला मशाल दाखवायची आहे. भाजपाने शिवसेना चोरली, राष्ट्रवादी चोरली आणि आता ठाकरे गट फोडण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. पण ते आता शक्य नाही. महाराष्ट्रातील उमेदवारांकडून सभेसाठी मला बोलावले जात आहे. परंतू मी पहिल्यांदा ओमराजे यांचे नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी हजर झालो. शेतकर्यांचे सरकार निवडून आणायचे असेल तर ओमदादांना निवडून द्या, असेही त्यांनी सांगितले.

### निवडणुकीत घड्याळाचे १२ वाजणार - आ.रोहीत पवार



पूर्वीच्या राष्ट्रवादीच्या घड्याळ चिन्हात १० वाजून १० मिनिटे असायची. त्यांनी घड्याळ चिन्ह चोरले. आता त्यात ४.२० वाजले आहेत. या लोकसभा निवडणुकीत घड्याळाचे १२ वाजणार आहेत, असे सांगून आ.रोहीत पवार म्हणाले की, ही लढाई फार मोठी आहे. आपल्यासमोर आर्थिक ताकद मोठी आहे. ती ताकद या निवडणुकीत पायदळी तुडवून टाका. ही निवडणूक आपण आताच जिंकलेली आहे, फक्त मताधिक्य किती मिळणार ? याची उत्सुकता आहे. शरद पवार साहेब यांचे कुटुंब हे केवळ पवार घराण्यापुरते नसून संपूर्ण महाराष्ट्रातील जनता ही पवार साहेबांचे कुटुंब आहे. भाजपा सरकारने मराठा, धनगर आरक्षणाचा प्रश्न अजून अधांतरी ठेवला आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा मुद्दा पुढे करुन जिल्हा परिषद, नगर परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका रखडवून ठेवल्या. नेते गेले तरी निष्ठावंत कार्यकर्ता आणि सामान्य जनता आपल्यासोबत आहे. म्हणून भाजपाला हद्दपार करण्यासाठी आणि इंडिया आघाडीचे सरकार आणण्यासाठी सर्वांनी पुढे यावे, असेही त्यांनी सांगितले.

### देशाच्या भवितव्याची ही निवडणूक - अमित देशमुख

महाराष्ट्राचे दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि पवनराजे साहेब यांचे नाते आगळेवेगळे होते. हे नाते जपण्याकरिता आपण स्वतः ओमराजे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आलो असल्याचे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण मंत्री अमितभैय्या देशमुख यांनी सांगितले. ते म्हणाले की, धाराशिवच्या, महाराष्ट्राच्या आणि देशाच्या भवितव्याची ही निवडणूक आहे. भाजपाच्या फोडाफोडीच्या राजकारणाची जनतेला चीड येत आहे. आधी शिवसेना नंतर पवार कुटुंब फोडले. याचा बदला घ्यायचा असेल तर जनतेने आता महाविकास आघाडीच्या पाठीशी उभे रहावे असे आवाहन केले. तसेच शेतीमालाला हमीभाव देण्यासाठी सुशिक्षित बेरोजगारांचे



प्रश्न सोडविण्यासाठी, मोठे उद्योग उभारण्यासाठी, मतदारसंघात सर्व धर्म समभाव जोपासण्यासाठी ओमराजे यांना निवडून द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. विशेष म्हणजे महाराष्ट्रात सगळीकडे भ्रष्टाचार बोकाळल्यामुळे जनतेच्या हक्काचे सरकार आणण्यासाठी महाविकास आघाडीशिवाय पर्याय नसल्याचेही त्यांनी सांगितले.

### महाराष्ट्रातील गद्दारीला गाडून टाका - खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर



उमेदवार खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर म्हणाले की, ज्यांनी २०१९ साली पक्षाशी गद्दारी करुन भाजपात गेले. त्यांना पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही. म्हणून पुन्हा पक्ष बदलावा लागला. तेच लोक आता माझ्या फोनबाबत बोलत आहेत. पण सामान्य माणसाचे काम मार्गी लावण्यासाठी मी फोन उचलून बोलतो. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्त्वावर आम्ही चालतो आहोत. डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या काळात धाराशिव जिल्ह्यासाठी मंजूर झालेले वैद्यकीय महाविद्यालय नेरुळला कोणी पळवून नेले, हे जनतेला ठाऊक आहे. स्वतःच्या ट्रस्टला वैद्यकीय महाविद्यालय जोडून ते स्वतःच्या मालकीचे केले. या वैद्यकीय महाविद्यालयात स्वखर्चाने रुग्णांवर उपचार करत असल्याचे ते सांगत असले तरी सरकारच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून १८ कोटी २३ लाख रुपये उचलल्याची माहिती उघडकीला आली असल्याचा गौप्यस्फोट त्यांनी केला. आतापर्यंत किती पेशंटवर तुम्ही उपचार केले ते आधी सांगा, असा खडा सवालही त्यांनी केला. पाच वर्षे मी प्रामाणिकपणे जनतेची कामे केली आहेत. यावेळेसच्या निवडणुकीत मशाल चिन्हाच्या पाठीशी राहून महाराष्ट्रातील गद्दारीला गाडून टाका, असे आवाहनही त्यांनी केले.

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी नागरिकांचा महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक विशेषता युवक हजारोंच्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. तुळजापूर नाका परिसरात असलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस अभिवादन करून या रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर धारासुर मर्दिनी, शमशुद्दीन गाजी रहे, काळा मारुती आदी ग्रामदैवतांचा आशिर्वाद घेतला. तर संत गाडगेबाबा, डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आधी महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ही रॅली तुळजापूर नाका, धारासुर मर्दिनी मार्गे दर्गाह मैदान, विजय चौक, नेहरू चौक, निंबाळकर गल्ली, काळा मारुती चौक, पोस्ट ऑफिस, संत गाडगेबाबा महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे नगर परिषदेच्या सभागृहासमोरील प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या सभास्थळी दाखल झाली. या रॅलीमध्ये युवा शिवसेना प्रमुख आदित्य ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार व काँग्रेसचे नेते माजी मंत्री आमदार अमित देशमुख हे या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. आदित्य ठाकरे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रचंड घोषणाबाजी व जल्लोष करण्यात आला. तसेच रखरखत्या उन्हात काढण्यात आलेल्या रॅलीच्या स्वागतासाठी संपूर्ण रस्ता परिसरामध्ये असलेल्या बिल्डिंगमधून फुलांचा वर्षाव करण्यात आला. तर दर्गा परिसरात जेसीबीच्या सहाय्याने खासदार राजेनिंबाळकर व आमदार कैलास पाटील यांच्यासह महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. तसेच निंबाळकर गल्लीत देखील जेसीबी द्वारे मला मोठा हार घालून त्यांचे स्वागत केले. तर डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात आदित्य ठाकरे, खा राजेनिंबाळकर व आमदार कैलास पाटील यांच्यासह महायुतीच्या नेत्यांचे जेसीबीच्या साह्याने पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी हलगी व बँडचा निनाद तसेच महायुतीचा विजय असो यासह विविध घोषणा देत संपूर्ण शहर महायुतीमय झाले होते. या रॅलीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे आमदार रोहित पवार, मशाल, तुतारी व हात यांचे कार्यकर्त्यांनी हाती घेतलेले फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

### देवपूजा करून वडिलांच्या प्रतिमेचे घेतले आशीर्वाद

खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी देवघरात पूजन करून वडील स्व. भूपालसिंह उर्फ पवन राजेनिंबाळकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करुन आशीर्वाद घेतले. त्यानंतर तुळजापूर येथे कुलस्वामिनी श्री तुळजभवानी मातेचे दर्शन घेऊन धाराशिव शहरात दाखल झाले.

## केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक ५ हजार रुपये सूट द्यावी - मुंडे

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – कोरोना काळानंतर महाराष्ट्रासह सबंध देशात वृत्तपत्र व्यवसायावर मोठा परिणाम झाला असून खप आणि जाहिरातींचे प्रमाणही कमी झाले आहे. परिणामी वृत्तपत्र व्यवसायावर अवलंबून असणारे पत्रकार आणि इतर कर्मचाऱ्यांसमोर रोजगाराचाच प्रश्न निर्माण झाला आहे. देशभरात छोट्या-मोठ्या वृत्तपत्रांचा ३५ हजार कोटी रुपयांचा व्यवसाय अडचणीत आला आहे. यासाठी केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकरदात्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपयांची सूट द्यावी अशी मागणी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी धाराशिव लोकसभेचे विद्यमान खासदार आणि महाविकास आघाडीचे विद्यमान उमेदवार ओमराजे निंबाळकर यांच्याकडे केली.यावर खासदार ओमराजे निंबाळकर यांनी वृत्तपत्र आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही मागणी रास्त असल्याने मी आपल्या आशीर्वादाने पुन्हा खासदार झाल्यावर लोकसभेमध्ये हा विषय निश्चित सभागृहात सरकार पुढे लावून धरेल असे अभिवचन दिले.

धाराशिव येथील पवन राजे कॉम्प्लेक्स येथे महाविकास आघाडीचे उमेदवार तथा धाराशिव चे विद्यमान खासदार माननीय श्री ओमराजे निंबाळकर यांची पत्रकार



संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन विस्तृत निवेदन दिले. यावेळी पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी राज्य कार्यकारणी सदस्य बाबासाहेब देशमाने यांच्यासह धाराशिव चे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील पत्रकार संघाचे धाराशिव येथील पदाधिकारी पत्रकार श्रीराम क्षीरसागर रामेश्वर डोंगरे सय्यद कलीम मुसा यासह पत्रकार बांधव उपस्थित होते यावेळी खासदार ओमराजे निंबाळकर यांना अधिक माहिती सांगताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले की, केंद्र सरकार खाजगी विमा कंपन्यांचा व्यवसाय वाढावा आणि लोकांनी विमा घ्यावा यासाठी विमा घेणाऱ्या ग्राहकाला वार्षिक उत्पन्न करात एका विमा हप्त्या इतक्या रक्कमेची सूट दिली जाते. तसेच अनेक छोट्या-मोठ्या उद्योगांना सरकार वेगवेगळ्या स्वरूपाची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आर्थिक मदत देते. याच धर्तीवर वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकर दात्यांना

### या मागणीस माझा जाहीर पाठिंबा - खा. राजेनिंबाळकर

वार्षिक पाच हजार रुपयांची सूट दिली तर वृत्तपत्रांची मागणी वाढेल आणि या व्यवसायाला उर्जित अवस्था प्राप्त होईल. यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल तसेच या व्यवसायातील लोकांना आर्थिक स्थिरता येईल. आणि वाचन संस्कृतीचीही जोपासना होईल. महाराष्ट्रात सध्या शासनाच्या यादीवर असलेले दीड हजार वृत्तपत्र व साप्ताहिके आहेत. या व्यवसायावर अवलंबून असणारे हजारो लोक आहेत. यासाठी आपण पुढाकार घ्यावा आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा अशी मागणी केली. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी राज्याच्याच नव्हे तर देशातील मीडियाच्या आर्थिक हितासाठी केलेली मागणी ही रास्त आणि हिताची असल्यामुळे मी या मागणीला जाहीर पाठिंबा देत आहे. एवढेच नव्हे तर ही मागणी मी आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा खासदार होवून लोकसभेच्या सभागृहात गेल्यावर निश्चित मार्गी लावण्यासाठी आपल्या खांद्याला खांदा लावून सभागृहात लढेल असे आश्वासन दिले.

## प्रस्थापित उमेदवारांना त्यांची जागा दाखविणार - जाधव

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – शोषीत, वंचित व बहुजनांच्या न्याय हक्कासाठी आजपर्यंतच्या सत्ताधाऱ्यांनी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. सत्तेमध्ये असलेल्या प्रस्थापितांनी त्यांना न्याय मिळवून देण्याऐवजी त्यांच्यावर अन्यायच केला. तसेच राज्यात एकाही बंजारा समाजाला उमेदवारी दिलेली नाही. त्यामुळे गोर सेनेकडून उस्मानाबाद लोकसभेची शामराव पवार यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली असून प्रस्थापित उमेदवारांचा माज जिरविणार असल्याचा इशारा गोर सेनेचे तथा बंजारा सामाजिक संघटनेचे अध्यक्ष दिलीप जाधव यांनी दिला.

धाराशिव शहरातील रायगड फंक्शन हॉलमध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उमेदवार श्यामराव पवार, समनक जनता पार्टीचे सहसचिव राजाभाऊ पवार, गोर सेनेचे जिल्हाप्रमुख दिलीप जाधव, समनक जनता पार्टीचे जिल्हाप्रमुख बालाजी राठोड, दिलीप आडे, राजाभाऊ



राठोड, प्रेमदास पवार, मोहन राठोड, महादेव जाधव, पवन राठोड, कालिदास चव्हाण व राजू चव्हाण आदी उपस्थित होते. पुढे बोलताना दिलीप जाधव म्हणाले की, प्रस्थापिताच्या हिसक्यात मागास वंचित समाज अडकलेला आहे. बंजारा समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असून आमचा एकही उमेदवार दिलेला नाही. त्यामुळे या समाजाने गोर सेनेच्या माध्यमातून वाशिम, हिंगोली, यवतमाळ व नांदेड या लोकसभा मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे केलेले आहेत. आम्ही फक्त बंजारा समाजासाठी भांडत नसून सर्व मागास समाजाने एकत्र यावे व अन्याय अत्याचाराविरुद्ध लढून आपल्या उमेदवाराला लोकसभेत पाठवावे असे आवाहन केले. आमचे उमेदवार येथील किंवा नाही हे जनताच ठरविणार आहे मात्र आम्ही समोरच्याची निश्चितपणे जिरविण्यामध्ये यशस्वी होऊ असा ठाम दावाही त्यांनी केला. विशेष म्हणजे संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून शोषित वंचित घटकांना न्याय अधिकार व हक्क याची तरतूद करून ठेवलेली आहे. ते मिळविण्यासाठी त्यांनी हिम्मत देखील संविधानाच्या माध्यमातून दिलेले आहे. त्यामुळे सर्व समाज घटकांनी प्रस्थापिता विरोधात एकत्रित येत व एक गटाने मतदान करून घराणेशाही संपवावी असे आवाहन केले. आम्ही या माध्यमातून सर्वांना न्याय हक्क व अधिकार देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत असे सांगत बंजारा समाजाचे २५ खासदार व शेकडो आमदार होऊ शकतात. मात्र या समाजावर प्रस्थापितांनी घोर अन्याय केला असल्यामुळे प्रस्थापित उमेदवारांना त्यांची जागा दाखविणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

# संपादकीय

## राजकीय संशयकल्लोळ

देशामध्ये सध्या १८व्या लोकसभेसाठी होत असलेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने युती, महायुती, आघाडी, मैत्रीपूर्ण लढत, बंडखोरी, नाराजी, मातब्बरांचे तिकीट कापले जाणे, महत्त्वाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते अचानक नॉट रिचेबल' होणे अशा विविध घडामोडींनी राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून देशाच्या कानाकोपऱ्यांत लोकांशी संपर्क करण्यासाठी, आपल्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी प्रचारसभा, निवडणूक रॅली, कॉर्नर सभा आदी घडामोडी गतिमान झाल्या आहेत. नेहमीच बंद असणारी पक्षाची कार्यालयेही आता उघडी दिसू लागली आहेत. निवडणुका म्हटल्यावर आयाराम-गयाराम संस्कृती याच काळात फोफावते आणि निवडणूक संपल्यावर पुन्हा ही संस्कृती थंडावते. सध्या होत असलेली निवडणूक ही भाजपा व मित्रपक्षांसाठी तसेच कॉंग्रेस व त्यांच्या मित्रपक्षांसाठी प्रतिष्ठेची आहे. पण या प्रतिष्ठेतही कमालीचा फरक आहे. भाजपाला केंद्रात सलग तिसऱ्यांदा सत्तेत येऊन पंतप्रधानपदी नरेंद्र मोदींना विराजमान करायचे आहे. आपण निवडणूक जिंकणार व पुन्हा सत्ता संपादन करणार, असा विश्वास भाजपा व त्यांच्या मित्रपक्षांमध्ये पाहावयास मिळत आहे.

या विश्वासामुळे निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वी, आचारसंहिता लागण्यापूर्वीच काही महिने अगोदर अब की बार, चार सौ पार' हा नारा भाजपाकडून देण्यात आला आहे. एकीकडे भाजपा आघाडीत आत्मविश्वास असून प्रचारयंत्रणेवरही त्याचा प्रभाव पाहावयास मिळत आहे. दुसरीकडे कॉंग्रेस व मित्रपक्षांची असलेली इंडिया आघाडी प्रारंभापासूनच अडखळत चालली आहे. कॉंग्रेसच्या सोबत असलेले मित्रपक्ष भाजपाकडे निघून गेले आहेत आणि आता सोबत असणारे मित्रपक्ष कॉंग्रेसला फारसे जुमानत नसल्याचे पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेशमधील घडामोडींदरम्यान पाहावयास मिळाले आहे. एकेकाळी अनेक वर्षे देशाच्या लोकसभेत व विविध राज्यांच्या विधानसभेत सत्ता उपभोगणाऱ्या कॉंग्रेसवर आज मित्रपक्ष त्यांचा प्रभाव असणाऱ्या राज्यांमध्ये देतील त्या जागा लढविण्यावर समाधान मानण्याची वेळ आली आहे.

महाराष्ट्रातही लोकसभा निवडणुकीचा ज्वर चांगलाच चढला आहे. महाराष्ट्रात मविआ आणि महायुतीमध्ये निकराचा संघर्ष होत आहे. महायुती असो अथवा मविआ, दोन्ही गटांकडून प्रत्येक जागेवर विचारपूर्वक उमेदवार दिला जात आहे. मित्रपक्ष विचारविनिमय करूनच जागा ठरवत आहे. त्यामुळे सातारा, ठाणे व अन्य जागांवरील उमेदवार अजून जाहीर झालेले नाहीत. केवळ खासदार सतत निवडून येतोय म्हणून परत द्या त्यालाच तिकीट, हे सूत्र या निवडणुकीत पाहावयास मिळत नाही. शिवसेनेने सलग पाच वेळा लोकसभा निवडणूक जिंकणाऱ्या भावना गवळी यांचे तिकीट कापले. खासदार भावना गवळी या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राखी बांधत आहेत.


स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही भावना गवळी यांना बहीण मानतात. तथापि केंद्रात सत्ता संपादन करण्यासाठी प्रत्येक जागा महत्त्वाची असल्याने पंतप्रधान व मुख्यमंत्री ज्यांना बहीण मानतात, त्या भावना गवळींचे शिवसेनेने पर्यायाने महायुतीने तिकीट कापल्याने ही निवडणूक महायुतीने हलक्यात घेतली नसल्याचे या कृतीतून पाहावयास मिळत आहे. महायुतीत व मविआमध्ये एक फरक महाराष्ट्रीय जनतेला या निवडणुकीत जवळून पाहावयास मिळाला आहे. तो म्हणजे तिकीट नाकारले, जागावाटपात जागा मिळाली नाही म्हणून महायुतीत किरकोळ नाराजी वगळता फारसा गोंधळ झालेला दिसत नाही. या उलट मविआमध्ये मात्र नाराजीनाट्य मोठ्या प्रमाणावर उफाळून आले आहे.

रामदास आठवले यांचा आरपीआय, सदाभाऊ खोत यांचा पक्ष हे लोकसभा तिकिटीसाठी इच्छुक असतानाही त्यांना महायुतीत जागा मिळाल्या नाहीत म्हणून त्यांनी कोणत्याही प्रकारचे राजकीय आकांडतांडव केले नाही. याउलट मविआमध्ये सध्या सांगली व मुंबई तसेच भिवंडी जागेवरून जोरदार वाद निर्माण झाला असून राजकीय कलगीतुरा सुरू आहे. हा वाद कॉंग्रेस आणि उबाठा शिवसेनेतच सुरू झाला आहे. मुंबई कॉंग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांचे नॉट रिचेबल होणे, पक्षाचे पदाधिकारी भेटायला गेल्यावर त्यांची भेट नाकारणे असे प्रकार सुरू झाले आहेत. मविआत जागावाटप जाहीर झाल्यावरही सांगलीच्या जागेसाठी कॉंग्रेसने आग्रही राहणे, तेथील स्थानिक नेत्यांनी पत्रकार परिषद घेत आपला दावा कायम ठेवणे, काहींनी वंचितच्या प्रकाश आंबेडकरांची भेट घेणे असे प्रकार सुरू झाल्याने महायुतीत शांतता असली तरी जागावाटपावरून मविआमध्ये सर्व काही आलबेल नसल्याचे पाहावयास मिळाले आहे. अर्थात निवडणुका म्हटल्यावर रुसवे-फुगवे, मनधरणी हे प्रकार होतच असतात.प्रत्येकालाच आपले राजकीय शक्तिप्रदर्शन करायचे असते. निवडणुकांच्या माध्यमातून राजकीय उपद्रवमूल्य दाखवून द्यायचे असते. पण ते पेल्यातीच वादळ ठरवायचे असते, त्याचा स्फोट करायचा नसतो. अर्थात याची झळ अमरावतीच्या माध्यमातून महायुतीलाही बसली आहे. अमरावतीत महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या बच्चू कडू यांनी भाजपा उमेदवार नवनीत राणा यांच्याविरोधात आपला उमेदवार उभा केला आहे. कोल्हापूरची जागा मविआत कॉंग्रेसला गेल्याने सांगलीच्या जागेसाठी शिवसेना उबाठाने उमेदवार जाहीर केला व जागावाटप घोषित होण्यापूर्वीच शिवसेना उबाठाच्या उमेदवाराने आपला प्रचारही सुरू केला आहे. कोल्हापूर व सांगली या दोन्ही जागा कॉंग्रेसला देणे म्हणजे मविआचे अन्य मित्रपक्ष या भागात नगण्य असल्याचा संदेश गेला असता. मुळातच कॉंग्रेसने आकांडतांडव करत मविआला अडचणीत आणणे योग्य नाही.सांगली वसंतदादा पाटील यांचीच असा टाहो आज कॉंग्रेस फोडत असली तरी त्या ठिकाणी भाजपाचा खासदार आहे. वसंतदादांची सांगली म्हणणाऱ्या कॉंग्रेसला ही जागा टिकविता आली नसल्याचे सत्य कॉंग्रेसलाही नाकारता येणार नाही. मुंबई, ठाणे, भिवंडी व अन्य जागांवर भाजपाचे खासदार असताना त्याही जागा कॉंग्रेसने प्रतिष्ठेच्या केल्या आहेत. अर्थात उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी हे वादळ शमेल. कॉंग्रेसमध्ये नाराजी व्यक्त करण्याचा अधिकार आहे. पण हेच कॉंग्रेसचे घटक हायकमांडचा आदेश नाकारण्याचे धाडस दाखवू शकत नाही. सध्या लोकसभा निवडणुका कॉंग्रेससाठीही प्रतिष्ठेच्या असल्याने मविआतील मित्रांना दुखावणे कॉंग्रेसला परवडणारे नाही.

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

## लुई पाश्चर ६८



रोगट कुत्रा चावल्यामुळे होणाऱ्या 'रेबीज' किंवा 'हायड्रोफोबिया' या रोगावर लस शोधणाऱ्या थोर फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ लुई पाश्चर यांचा जन्म २७ डिसेंबर १८२२ मध्ये पाश्चर कुटुंबात झाला. लहानपणी शाळेमध्ये असताना चित्रकला व गणित हे विषय त्याच्या आवडीचे होते; परंतु पुढील शिक्षण घेता घेता ड्युमा नावाच्या शास्त्रज्ञाची रसायनशास्त्रावरील भाषणे ऐकून तो खूप प्रभावित झाला. त्यामुळे रसायनशास्त्र विषय त्याला खूप आवडू लागला. पुढे याच विषयातील पॅरिस विद्यापीठातून त्याने पदवी प्राप्त केल्यानंतर तो रसायनशास्त्राचा प्राध्यापक म्हणून काम करू लागला. स्ट्रसबर्ग, एकोल, नॉर्मन अशा अनेक ठिकाणी तो कार्यरत राहिला. रसायन विषयाचा प्रमुख म्हणून १८६७ साली सॅबोर्न विद्यापीठात तो काम करू लागला.

सूक्ष्मजंतू-शास्त्र यावर लुई पाश्चरने खोलवर अभ्यास केला. १८८८ साली 'लुई पाश्चर इन्स्टिट्यूट' ही संस्था त्याने स्थापन केली. तेव्हापासून त्याच्या संशोधनकार्यास अधिक गती मिळाली. टार्टरिक ॲसिडवर त्याने प्रथम संशोधन केले. 'फर्मेंटेशन' मधील बॅक्टेरिया म्हणजे विपाकक्रियेतील अतिसूक्ष्म सखोल संशोधन सुरू केले. त्याचप्रमाणे यीस्ट किंवा 'सुराबीज' या सूक्ष्म जंतूचेही त्याने संशोधन केले. अशा सूक्ष्म जंतूपासनूच अनेक प्रकारचे रोग पसरतात असा ठाम विश्वास असणाऱ्या संशोधकापैकी लुई होता. त्याने आपल्या संशोधनाद्वारे पदार्थातील निर्जीवीकरण म्हणजे पाश्चरायझेशन ही प्रक्रिया शोधून काढली. ती त्याच्याच नावाने प्रसिद्ध आहे. दुग्धाम्ल किंवा लॅक्टिक ॲसिडमध्ये त्याने संशोधन केले.दूध नासू नये म्हणून एक परिणामकारक पद्धती लुई पाश्चर यांनी शोधून काढली. हीच ती 'पाश्चरीकरण' पद्धत. बाजारात विकले जाणारे दूध आणि लोणी अगोदर 'पाश्चरीकरण' करून मग विक्रीस नेतात. या प्रक्रियेत दूध, मद्य, लोणी इत्यादी पदार्थ एका विशिष्ट तापमानापर्यंत तापवितात व तात्काळ थंड करतात. त्यामुळे त्यातील सूक्ष्मजंतू मरतात. पाश्चरीकरणामुळे दुधाचे नासण्यापासून संरक्षण तर होतेच पण त्यामुळे क्षय वा अन्य रोगांचे जंतूही मरतात. लुई पाश्चरने रेशमाच्या किड्यावरील रोगजंतूंचा शोधही १८६५ मध्ये लावला. ॲल्स नावाच्या जनावरांच्या रोगाचे जंतूही त्याने शोधून काढले. गेल्या शतकात 'जंतुनाशक' हा शब्दच लोकांना ठाऊक नव्हता. हॉस्पिटल्समधून हात न धुता, हत्यारे, बँडेज न उकळवता डॉक्टर शस्त्रक्रिया करीत. त्यामुळे धनुर्वाताने लोक मरत. त्याचेही त्याने संशोधन केले.लुईने लोकांना पटवून दिले की, जंतू आपोआप निर्माण होत नाहीत तर ते हवा, अन्न-पाण्यातून प्रवेश करतात. लुईने जंतूंचा नाश करून दाखवला. त्यामुळे सर्व राष्ट्रांनी त्याला बहुमोल पदव्या दिल्या. लुईने कौटुंबिक आयुष्यात खूप दुःखे भोगली तरीसुद्धा आणि शेवटी पक्षाघाताने गाठले तेव्हाही शेवटपर्यंत तो प्रयोग करतच राहिला. असा हा थोर शास्त्रज्ञ २८ सप्टेंबर १८९५ रोजी निवर्तला.

## आचारसंहितेचे पालन करताना जाणून घ्या – 'काय करावे' आणि 'काय करू नये'

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका २०२४ जाहीर होऊन प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. न्याय्य आणि नि:पक्षपाती वातावरणात निवडणुका पार पडाव्यात यासाठी भारत निवडणूक आयोगाने काही नियम ठरवून दिले आहेत. या नियमांनाच 'आचारसंहिता' म्हटले जाते. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्वच राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी या आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी दिली आहे.

आचारसंहिता अधिक विस्तृत असल्याने त्यापैकी निवडणूक काळात राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी 'काय करावे' आणि 'काय करू नये' याबाबत काही महत्त्वाची तत्वे सांगितलेली आहेत. जाणून घेऊया याबाबतची माहिती.


काय करावे?निवडणूक घोषित होण्यापूर्वी सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे सुरू ठेवता येतील. पूर, अवर्षण इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी मदतीचे कार्य सुरू ठेवता येईल. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रकमेची किंवा इतर वैद्यकीय मदत देता येईल. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका ही त्यांची धोरणे, पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी. स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक किंवा इतर सुविधांचा वापर करण्याची परवानगी मिळवावी आणि ते वापरण्याच्या नियमांचे पालन करावे. सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या, सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी. मिरवणूक सुरू होण्याची तसेच संपण्याची वेळ व जागा आणि ती जिथून जाणार असेल तो मार्ग अगोदर निश्चित करून पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. सर्व कार्यकर्त्यांनी बिल्ले व ओळखपत्र ठळकपणे लावावेत आणि मतदारांना पुरविण्यात येणाऱ्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये.



काय करू नये? निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे पालन करताना राजकीय पक्ष तसेच उमेदवारांना सत्ताधारी पक्ष शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात करण्यास प्रतिबंध आहे. उमेदवार आणि मतदानासाठी आलेला मतदार यांच्याशिवाय इतर कोणाही मंर्त्याला मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येणार नाही. शासकीय काम आणि निवडणूक मोहीम निवडणूक प्रचार यांची सरमिसळ करू नये. इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करू नये. वेगवेगळ्या जाती, समूह आणि धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष, तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. सर्व धर्मिय प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासाठी करू नये. मतदारांना लाच देणे, दारुचे वाटप करणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण वा धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासांत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यांसारख्या गोष्टींना मनाई आहे. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करू नये. तसेच त्यामुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण करू नये. ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये.

इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत. याचबरोबर मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाजवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.आचारसंहितेच्या या तत्त्वांचा भंग झाल्याचे नागरिकांना आढळल्यास त्यांनी सी-व्हिजील ॲपवर ध्वनीमुद्रण, ध्वनीचित्रमुद्रण या माध्यमातून तक्रार करावी, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## दु:खावर विजय मिळवा



सिद्धार्थ नावाचा राजकुमार होता.


त्याला जीवनात काहीच कमी नव्हते. तो सुंदर, सुदृढ व सदृहस्थ होता. त्याला कुठलेही शारीरिक किंवा मानसिक कष्ट नव्हते. त्याच्यापुढे सुख-समृद्धी हात जोडून उभी होती. त्याची पत्नी यशोधरा ही सुंदर, सुदृढ व पतीव्रता होती. त्याचा मुलगा राहुल सुद्धा मनमोहक व सुदृढ होता. सर्व काही होऊनही सिद्धार्थ दु:खाच्या अनुभूतीने पिडीत राहत होता.

खरं म्हणजे जन्मानंतर माणूस कुठल्यातरी शारीरिक किंवा मानसिक दु:खाने पिडीत असतो.

दु:खांना पाहून व अनुभवूनच सिद्धार्थ बुद्धात रूपांतरित झाले. अभावावाचे कारण आपण अभावासच दु:खाचे कारण मानतो. जगातील बहुतेक श्रीमंत लोक दु:खी व असमाधानी आहेत. एखादी वस्तु किंवा व्यक्तीचा अभावच त्यांना दु:खी करतो. काही लोकांकडे पैशांची कमी नाही पण ते शारीरिक दु:खाने पिडीत आहेत.

काही लोक काम, क्रोध, ईर्ष्या, द्वेष, मोह सारख्या मानसिक दु:खांनी ग्रस्त असतात. तसेच काही लोक अज्ञानामुळे दु:खी आहेत. जर काही लोकांना दु:ख नसेल तर त्यांच्यासाठी जन्म-मृत्यूचे दु:खच काय कमी आहे? विजय म्हणजे लक्ष्य.जगात सुखाचे काही क्षण असतात. याचे प्रमाण आपणास लोकांचे हसणे, बोलणे, गाणे, खेळण्यात व आनंद साजरा करण्यात मिळू शकते. काही लोक थट्टा-मस्करी करताना दिसतात पण हे सर्व सुख क्षणभंगुर व तात्पुरते आहे. हा सर्व खटाटोप दु:खातून वाट काढण्याचा उपक्रम आहे. जर दु:खास जीवनाचा एक भाग मानले तर आपण याचाच विचार करून आपण आपले बहुमूल्य जीवन नष्ट केले पाहिजे? नाही, आपले लक्ष्य दु:खांवर विजय मिळवणे आहे. हाच आमचा पुरुषार्थ आहे. जगास दु:खालय मानून तडफडत मरणे मानवाचा लज्जास्पद पराभव आहे. त्याने जगास परीक्षा-स्थळ मानत दु:ख-सागरास ओलांडण्याचा उपाय शोधला पाहिजे. यामुळे त्यास सुख व शांतता लाभेल. जिथे रोग आहेत, तिथे उपचार आहे, जिथे अडचणी आहेत, तिथे त्यातून निघण्याचा मार्ग उपलब्ध आहे. फक्त आपल्या हृदयात खरी जिज्ञासा असण्याची गरज आहे. तसेच आपल्या लक्ष्याप्रती निष्ठावान व साहसी बनावे. विचारवंत मानतात की, मानवाची विषय तृष्णाच सर्व दु:खांचे मूळ आहे. जर ते तृष्णाच्या मृग-मरीचिकात फसण्यात स्वत:ला वाचवू शकले तर निश्चितपणे त्यांना कुठलेच दु:ख असणार नाही.आपणास समोर जे दिसते, मनात तेच मिळण्याची इच्छा असते. जे आपल्याकडे आहे, त्यापेक्षा जास्त मिळवण्याची इच्छा करणेच तृष्णा आहे, जी कधीच पुर्ण होत नाही. जे आपल्याकडे आहे, त्यात समाधान मानून जर जास्तीत जास्त मिळवण्याची अनावश्यक इच्छा सोडली तर सर्व दु:ख टाळले जाऊ शकतात. जगातील सर्व वस्त नश्वर आहेत. जर व्यक्तीने ही गोष्ट मनात आत्मसात केली तर जगातील कुठलेच दु:ख त्यास विचलित करु शकत नाही. भगवान बुद्धांनुसार, दु:ख निवृत्तीतून निर्वाणीत आहे. स्वत:ला राग-द्वेषातून मुक्त करणेच निर्वाण आहे, ज्यास थोड्या प्रयत्नातून मनुष्य आपल्या जीवनातच मिळू शकते.

## राशी भविष्य



१७ एप्रिल २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर
सामाजिक कामात यश व सन्मान मिळण्याचे योग आहे. परिश्रमाचा पूर्ण मोबदला मिळेल. उत्पन्नात वाढ होईल. खाण्या:पिण्यावर लक्ष असू द्या. रोजगारात प्रगती राहील.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
पूर्वी केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसेल. मुलांच्या बाबतीत भावनीक समस्या निर्माण होतील. व्यापारात नवीन योजना आखाल त्या फायदेशीर असतील.

मिथुन : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण
मित्रांचे सहकार्य लाभेल. विचारपूर्वक काम केल्याने कामात यश मिळणार आहे. साथीदारांच्या कामावर लक्ष असू द्या. शिक्षणा संबंधीतील कामात यश मिळेल.

कर्क : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
कौटुंबिक सदस्याचे आपल्या विषयी मत चांगले राहील. काम करतांना वेळेचे बंधन राखा. आर्थिक गुंतवणूक विचारपूर्वक करा. रागावर नियंत्रण राखणे गरजेच आहे.

सिंह : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:उत्तर
कामात यश मिळाल्याने आनंदी रहाल. प्रवास फायदेशीर असणार आहे. नातेवाईकांशी असलेल्या संबंधावर मर्यादा राखा. कायदेशीर बाबी पूर्ण करा.कन्या : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर
मागील स्मृती उजाळल्यामुळे दु:ख होईळ. धार्मिक प्रवृत्तीत वाढ होईल. उच्च अधिकाऱ्यांच्या भेटी होती. काम चुकारपणा करू नका.

तुळ : शुभ रंग :पिवळा, शुभ दिशा: दक्षिण
कामकाजात आलेली समस्या आपल्या प्रयत्नामुळे दूर होईल. बाहेरील व्यत्तिंफ्च्या कामकाजावर विशेष लक्ष द्या. यश मिळाल्याने उत्साह वाढेल. व्यापार व्यवसाय फायदेशीर राहील. महत्वकांक्षा पूर्ण होतील.वृश्चिक : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:दक्षिण
मनमानीने काम करण्याची प्रवृत्तीमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती खराब राहील. कुटुंबातील सदस्यांच्या प्रकृतीची काळजी घ्या.धनु : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पूर्व
विशेष काम होण्याचे योग आहेत. साथीदाराचे सहकार्यामुळे मन प्रसन्न राहील. वहान चालवताना सावधानी बाळगा. शारिरीक कामात वाढ करण्याकरिता प्रयत्न करा.

मकर : शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पूर्व
जुन्या परिचित व्यक्तिची अचानक भेट होईल. मनोबलात वाढ होईल. आर्थिक स्थिती चांगली राहील. कामकाजाची परिस्थिती चांगली राहील. घरासंबंधातील समस्या निर्माण होऊ शकते.

कुंभ : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व
शुभकामाची रूपरेषा आखाल. राजकीय कामात यश मिळण्याचे योग आहेत. जास्त फायदा मिळण्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न फायदेशीर राहतील. दुसऱ्याच्या बोलण्यावर विश्वास दाखवू नका.मीन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व
जोशपूर्वक कामात रस घ्याल. हुशार व्यक्तिची भेट होईल त्यामुळे फायदा होईल. कौटुंबिक समाधान लाभल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या वस्तू संभाळा.

१३ एप्रिलला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, गुरू, हर्षल व मंगळाचा प्रभाव आहे. वैचारिक प्रांतात तुम्ही आघाडीवर असता. आपल्या क्रांतिकारक विचारसरणीने लोकांना धक्के द्यायला तुम्हाला आवडते. तुमच्याकडे उत्साहाचा प्रंचड साठा असतो. जुन्या नीतिमूल्यांबाबत तुम्हाला आदर असला तरी परंपरेच्या चौकटीत आपल्या व्यक्तिमत्वाला कोंडमारा होतो असे तुम्हास वाटते. व्यक्तिस्वातंत्र्याला तुम्ही खूपच महत्व देता. स्त्रीमुक्ती, दलितांच्या उध्दारासाठी सामाजिक कार्य करण्यात, त्यासाठी वेळप्रसंगी सामाजिक आंदोलन उभारण्यात तुम्ही अग्रेसर असता. तुमच्या लहरीपणामुळे तुमची विश्वासाहर्ता कमी होईल. नवे विचार पटण्यासाठी लोकांची मनोभूमिका बदलण्याचा प्रयत्न करा. क्षय, अपस्मार, भ्रमिष्ठपणा असे विकार तुम्हाला होऊ शकतात. मनस्थिती शांत ठेवण्यासाठी प्राणायाम, ध्यानधारणा, योग याबाबत मार्गदर्शन घ्या. उपासनेनेही मन स्थिर राहील.

कार्यक्षेत्र : ज्या ज्या ठिकाणी तुमच्या वैज्ञानिक वृत्तीला, जिज्ञासू स्वभावाला आव्हान मिळेल अशा संशोधक क्षेत्रात तुम्ही चमक दाखवू शकाल. संगणक क्षेत्र, माहिती व तंत्रज्ञान, विजेशी संबंधीत क्षेत्र यात महत्वाचे पद लवकर मिळेल. असामान्य प्रतिभेमुळे कलाक्षेत्रात, साहित्यात तुम्ही मोठी झेप घेऊ शकाल. मानवजातीच्या कल्याणासाठी चाललेल्या जेनेटिक इंजिनियरिंग किंवा बायोटेक्नॉलाजीत तुम्ही महत्वाचे संशोधन करू शकाल.

प्रणयी जीवन : एकाच व्यक्तीच्या प्रेमात गुंतून राहणे तुम्हाला अवघड जाते. प्रत्येक प्रेमाची नवी नवलाई तुमच्या बाजूने लवकर ओसरून जाते. व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करीत असल्याने तुमच्यावर वर्चस्व गाजवलेले तुम्हाला आवडत नाही. त्यामुळे जोडीदार २१ मार्च ते २० एप्रिल दरम्यानचा निवडू नका. जुलै २१ ते ऑगस्ट २१ मधील व्यक्तीशी तुमचे सुर चांगले जमतील. वर्षफळ : आर्थिक परिस्थिती पूर्ण वर्षभर उत्तम राहील. अंतराळसंशोधनाला पाठिंबा देणाऱ्या संस्थेत महत्वाचे पद मिळू शकेल. जानेवारी फेब्रुवारी मध्ये आकर्षक व्यक्तीशी परिचय होईल. प्रेमबंधनाचे धागे अधिक दृढ होतील. जून जुलै मध्ये नोकरीत उच्चाधिकार मिळण्याची शक्यता आहे. संशोधनाला वाव मिळेल. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये मुलांच्या शिक्षणाकडे जातीने लक्ष्य द्यावे लागेल. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये भागीदारीच्या व्यवसायाचा प्रस्ताव येईल. महत्वाचे वर्ष : ४, १३, २२, ३१, ४०, ४९, ५८, ६७, ७६. भाग्यरत्न : लसण्या

याच तारेखेची व्यक्ती :

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# नांदेडमध्ये ऑटोचालकही मतदार जागृती उपक्रमात सहभागी

नांदेड(प्रतिनीधी): नांदेड लोकसभा मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढावा यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विविध स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. आज याचाच एक भाग म्हणून नांदेड जिल्ह्यातील ऑटोरिक्षा संघटनेच्या सहभागाने शहरात मतदान जनजागृती केली जाणार आहे.

नांदेड- वाघाळा शहर महानगरपालिकेत आज मंगळवार दिनांक १६ एप्रिल रोजी मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपच्या प्रमुख मिनल करनवाल व महापालिकीचे आयुक्त महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते ऑटोरिक्षांना मतदान करण्यासंदर्भाचे स्टीकर लावण्यात आले. यावेळी महापालीकेचे सहाय्यक आयुक्त गिरिष कदम, शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, डॉ. सान्वी जेठानी आदींची उपस्थिती होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी लोकशाहीच्या उत्सवात सर्व मतदारांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. या चळवळीत ऑटोरिक्षा संघटनेने पुढाकार घेतला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे. ऑटोरिक्षात बसणाऱ्या प्रत्येक प्रवाशांना येत्या २६ एप्रिल रोजी मतदान करण्यासाठी सांगावे असेही त्या म्हणाल्या.

यावेळी व्होट करेगा व्होट करेगा सारा नांदेड व्होट करेगा या घोषवाक्याने परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमाला टायगर ऑटोरिक्षा संघटनेचे पदाधिकारी, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, स्वीप कक्षाचे प्रलोभ कुलकर्णी, बालासाहेब कच्छवे, सुनील मुत्तेपवार, शुभम तेलेवार, सारिका आचने, साईनाथ चिद्रावार, आशा घुलज, रवी ढगे आदींची उपस्थिती होती.




### दिव्यांगांच्या मतदानासाठी ऑटोचालक येणार पुढे


नांदेड लोकसभा निवडणुकीत सर्वांना मतदानाचा अधिकार बजावता यावा, मतदानापासून कुणी वंचित राहु नये, या हेतूने दिव्यांग, बहुविकलांग मतदारासाठी टायगर ऑटोरिक्षा संघटनेच्या वतीने माफक दरात ऑटोरिक्षा सेवा उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. टायगर ऑटोरिक्षा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अहेमद बाबा बागवाले यांनी माहिती दिली. दिव्यांगांना मतदान केंद्र पर्यंत येण्यासाठी आमची गरज लागल्यास मदत करू ,असे त्यांनी सांगितले.


## वीजपुरवठा करणाऱ्या पोलला टिप्परची धडक

येरोळ : येथील ३३ के.व्ही. विद्युत उयकेंद्राला वीज पुरवठा करणाऱ्या मेन लाईनच्या पोलला माती टाकणाऱ्या टिप्परने धडक दिल्याने येरोळ गावासह नऊ गावाला रविवारी दुपारी एक वाजल्यापासुन उखाडा सहन करावा लागला आहे. रात्रही अंधारातच काढावी लागणार असल्याने वीज ग्राहक संतापले आहेत.

येरोळ येथील ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्राला चाकुर येथील १३२ विद्युत केंद्रातुन वीज पुरवठा सप्लाय केला जातो. उजळंब नजीक तलावातील काही शेतकरी टॅक्टर व मोठ्या हायवा टिप्परद्वारे शेतात गाळ माती टाकत आहेत. टिप्पर ड्रावरने मेन विद्युत पुरवठा करणारया लाईटच्या पोलला धडक देऊन पोल मोडल्याने येरोळ येथील ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्रातुन येरोळसह नऊ गावाला वीज पुरवठा होणारे नऊ गावे रविवारी एक वाजल्यापासुन उखाड्यात त्रस्त होत आहेत.

# महात्मा बसवेश्वर महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी रासुरे व महिला अध्यक्षपदी प्रेरणा होनराव यांची निवड





लातूर / प्रतिनिधी- पाचशे घर मठ आझाद चौक लातूर येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती महोत्सव समिती ची बैठक मा.श्री सिद्रामप्पा महाजन यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली या बैठकीत नवीन अध्यक्ष व महिला अध्यक्ष ची निवड करण्यात आली.

जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर सार्वजनिक जयंती महोत्सव समिती २०२४ च्या अध्यक्ष पदी मा.श्री. केदारअप्पा रासुरे व महिला अध्यक्ष पदी प्रेरणाताई होनराव यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली आहे या वेळी नुतन अध्यक्षांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी श्री. रामलिंग अप्पा ठेसे, श्री.सतिशप्पा खेकडे, श्री.रामलिंग अप्पा पाटील रायवाडीकर, श्री.बालाजी अप्पा पाटील रायवाडीकर, श्री.बसवेश्वर हेंगणे, श्री.सचिन रासुरे, श्री जगदीश येरटे अप्पा श्री.सुर्यकांत वाले, श्री ओंकारप्पा पंचाक्षरी, श्री.राजकुमार खोबरे अप्पा, बालाजी अप्पा पिंपळे, बाळासाहेब महाजन अप्पा, अशोक रासुरे अप्पा,सुमित रासुरे अप्पा, श्री नंदकुमार अंकुलगे अप्पा, श्री मन्मथ चिकले अप्पा, राजकुमार उपासे अप्पा, प्रदिप उपासे अप्पा, बसवेश्र्वर हालकुडे अप्पा, नागेश कळसे अप्पा, अरविंद वाडकर सर, श्री निवास मेनकुदळे अप्पा, श्री संगम रासुरे अप्पा, श्री सुनील रासुरे अप्पा, श्री अविनाश रासुरे अप्पा, श्री संतोष रासुरे अप्पा, श्री मोहन रासुरे अप्पा, श्री किर्तिकुमार रासुरे अप्पा, श्री सिद्रामप्पा महाजन, श्री सुनील ताडमाडगे अप्पा, श्री निखिल शेटकार अप्पा, श्री अनंद सलगरे अप्पा, श्री सोमनाथ रासुरे अप्पा आदी उपस्थित होते.

# श्री महादेव विद्यालयाचे सहा विद्यार्थी एनएममएस परीक्षेत शिष्यवृत्तीधारक



वलांडी-देवणी तालुक्यातील धनेगाव येथील श्री महादेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवीतील सहा विद्यार्थी एनएममएस परीक्षेत शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत.

या परीक्षेत ६ विद्यार्थी शिष्वृत्ती धारक झाले आहेत, यामधे २ एनएममएस तर ४ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत. या २ विद्यार्थ्यांना *दरवर्षी १२००० (बारा हजार ) याप्रमाणे चार वर्ष, असे एकूण ४८००० हजार रुपये शिषवृती मिळणार आहे .तर ४ विद्यार्थ्यांना १०००० प्रमाणे ४००००शिषयवृती मिळणार आहे, आतापर्यंत शाळेतून ६० पेक्षा जास्त विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. शाळेतील सर्व एनएममएस पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेच्या वतीने शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक साहेब श्री रामलिंग मुळे यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला. एनएममएस पात्र विद्यार्थ्यांत १- तूगावे मयुरी रमेश शिऊर २-सूर्यवंशी सुरज पंडित हेळंब तर सारथी शिष्यवृत्ती मध्ये १-बिरादार प्रीती राजकुमार धनेगाव,२-पाटील प्रतिभा वसंत धनेगाव ३-पाटील सोहम बळीराम शिऊर ४- डिगोळे सृष्टी बाळू हिसामनगर या विद्यार्थ्यांना मडपडवाड जी. एन., धडे आर. एस., मोमले एम.पी., महाजन बी.सी, सुतार एस.बी. यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्याध्यक्ष शिक्षण महर्षी डी.बी. लोहारे गुरुजी, अध्यक्ष इंजिनीयर अनिल मुळे, सचिव डॉ प्रा सौ सुनीताताई चवळे, कोषाध्यक्ष भालचंद्र पैके, प्राचार्य रामलिंग मुळे, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी व पालक, पर्यवेक्षक चंद्रकांत बंडगर, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थिनी यांनी अभिनंदन व कौतुक केले.

# साहित्यिकांनी खेड्यातील दु:खाच्या कारणाचा शोध घ्यावा

लातूर:- देशाने स्वातंत्र्याची पंचाहत्तरी पार केली तरी शेतकरी आत्महत्येची शृंखला थांबायचे नाव घेत नाही. खेड्याचे भणंग दारिद्र्य, दु:ख हा साहित्याचा भाग बनला. शेती अर्थकरणाच्या दूर्दशेचे परिणाम तीव्रतेने साहित्यातून उमटले. साहित्यिकांनी खेड्यातील दूर्दशेचा टाहो फोडण्यापेक्षाशेती व शेतकऱ्यांच्या दु:खाचे नेमके कारण शोधून खरंखुरं लेखन करावं, असे नम्र आवाहन शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व कृषी अर्थकारणाचे अभ्यासक अनंतराव देशपांडे यांनी मांडले. गांजूर येथे मराठवाडा साहित्य परिषद शाखा लातूर आयोजित चौथ्या शिवार साहित्य संमेलनात मबदलते खेडे आणि मराठी साहित्यफ या विषयावरील परिसंवादात बोलत होते. यात्प्रसंगी मंचावर परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. संग्राम मोरे, माधवराव मल्लेशे, कवी नरसिंग इंगळे व डॉ. ज्ञानदेव राऊत आदी मान्यवरांचा सहभाग होता.



यात्प्रसंगी डॉ. ज्ञानदेव राऊत म्हणाले, महात्मा गांधींनी मखेड्याकडे चलाफ अशी ऐतिहासिक हाक देऊन ग्रामस्वराज्याचे दिवास्वप्न देशवासीयांना दाखवले पण नेहरूंच्या मिश्र अर्थव्यवस्थने ते धुळीस मिळविले. स्वातंत्र्यानंतर खेडी ओस पडू लागली तर शहरं चकचकीत झाली. काळाची पावलं ओळखून ब्राह्मणांनी खेडी-वाडे सोडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मखेडे हे अज्ञान, अंधकार व अत्याचाराचे डबके असल्याने मशहराकडे चलाफ हा संदेश दिला. ज्यांनी खेडी सोडली ती सर्वार्थानं संपन्न झाली. मशेतीची बेडीफ शेतकऱ्यांच्या पायात अडकल्याने तो शेतीच्या चिखलवाटेत रूतत गेला.असे सांगून डॉ. राऊत यांनी, भास्कर चंदनशिव, शेषराव मोहिते, रा. रं. बोराडे, महादेव मोरे, इंद्रजित भालेराव, राजन गवस, श्रीकांत देशमुख, आसाराम लोमटे, सुरेंद्र पाटील, किरण गुरव, कृष्णात खोत, विजय जावळे, बालाजी सुतार, संतोष जगताप, संग्राम गायकवाड, बालाजी इंगळे, हंसराज जाधव आदींच्या साहित्यकृतीचे संदर्भ देत शेती शोषणाच्या कारणाचा चढता आलेख मांडत खेड्यांच्या स्थित्यंतराचा वेध घेतला.

शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते माधवराव मल्लेशे यांनी आपले शेती क्षेत्रातील कटू अनुभव कथन करताना आपणाला साहित्यातले तेवढं कळतं नाही पण शेतीमातीमध्ये दररोज उन्मळून पडलेली कष्टकरी माणसं वाचतो. आज शेती कसणे अवघड बनत चाललंय. मजूर मिळत नाही. बारदाना सांभाळण सोपं नाही. शेती करण्याचा खर्च वाढतोय. मालाला भाव नाही. जगण्याची हमी नाही. जी खेड्यात बोटावर मोजणारी सिमेंटची घर दिसतात. ती शेतीच्या समृद्धपणातून नाही तर शेती बाह्य उत्पन्नातून आल्याचे वास्तव, माधवराव मल्लेशे यांनी मांडले.

यावेळी कवी नरसिंग इंगळे यांनी मागील चाळीस पन्नास वर्षातील खेडे व आजचे त्याचे बदलते स्वरूप मोजक्या शब्दात व्यक्त केले.आपल्या बहारदार रचना सादर करून खेड्यातील बदलत्या सामाजिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक बदलाचा वेध घेत नेमकी वस्तुस्थिती अधोरेखित केली. नात्यागोत्यात संशयास्पद वातावरण तयार झाले असल्याची भावना इंगळे यांनी मांडली.

परिसंवादाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. संग्राम मोरे यांनी खेडे व शहरं यांची तौलनिकता दर्शवत अनुकरणशील मानवी वर्तनाचे कंगोरे मिश्किल शैलीत सादर केले. माहिती तंत्रज्ञान व वाढत्या मोबाईल माध्यमाचा, व्हायरल संस्कृतीचा आढावा घेतला. या परिसंवादाचे सूत्रसंचालन कवयित्री शैलजा कारंडे तर आभारप्रदर्शन डॉ. नयन राजमाने यांनी मांडले. यात्प्रसंगी बहुसंख्येने ग्रामस्थ व साहित्यिक, अभ्यासक उपस्थित होते.

# वैचारिक उत्क्रांतीचा मानदंड डॉ. बाबासाहेब आंबेडकर :डॉ.दिलीप नागरगोजे

लातूर / प्रतिनिधी- आदी मानव तीन अवस्थेत राहत होता. दिवसभर अन्न गोळा करणे, मिळविलेले अन्न खाणे व विश्रांती घेणे या अवस्थांच्या एक पाऊल पुढे जाऊन जेव्हा तो विचार करू लागला तेंव्हा पासून विचारशील मानवाचा जन्म झाला. कालांतराने जनमानसावर धर्माचा प्रभाव अधिक निर्माण झाला. मानवी जीवनाचे खरे कल्याण पारलौकिक जीवनात आहे. इहलोकात खरे व चिरंतन सुख नाही. अशी शिकवण दिली जात होती. यामुळेच समाजात स्पृश्य -अस्पृश असा भेदाभेद अधिक प्रमाणात सुरू झाला. कालांतराने स्वत:ला ज्ञानी समजणारे लोक इतर घटकावर अन्याय करू लागले.

याच कालखंडात सॉक्रेटिसने ङ्गज्ञान हाच सदगुण आहेफ हा विचार मानवी मनावर बिंबविण्याचा अहोरात्र प्रयत्न केला. या विचारामुळे त्यांना स्वत:चे जीवन संपवावे लागले. काही दर्शनकारांनी सुद्धा मानवी जीवनाचे खरे सुख पारलौकिक जीवनात नाही तर इहलोकात आहे अशी शिकवण दिली. धर्ममार्तंडांनी मांडलेला विचार बुद्धीच्या कसोटीवर तपासून पाहावे. यातून जीवनाचा खरा अर्थ समजेल, उमजेल व सबंध मानवी जमातीला तारता येईल अशी शिकवण काही तत्त्वचिंतकाकडून दिली जात होती.

तदनंतर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सुभेदार रामजी मालोजी सकपाळ यांचे सुपुत्र होते. ते संत कबीरांचे अनुयायी होते. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर जेमतेम दोन वर्षांचे असताना त्यांचे वडील सेवा निवृत्त झाले. तर वय वर्ष सहा असतानाच आईचे निधन झाले.

जिद्द, चिकाटी, आस्था, प्रयत्नांची पराकाष्टा, बुद्धीप्रामाण्यवाद आणि समाजाच्या उद्धारासाठी अथक परिश्रम यातुनच ते भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ, समाजसुधारक, नवभारताच्या संविधानाचे शिल्पकार, लोकशाहीचे त्राते, मानवी स्वातंत्र्याचे कैवारी बनले.

दलित चळवळीला प्रेरणा देऊन अस्पृश्याविरुद्ध होणारा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थनही त्यांनी केले.

डॉ बाबासाहेबांची एकूण जीवनकथा म्हणजे एक महाकाव्य, महानाट्य आहे. राष्ट्रनिष्ठेचे एक जाज्वल्य,उत्तुंग असे मूर्तिमंत उदाहरण आहे. अपरंपार अवहेलना, उपेक्षा पचवीत त्यांनी आपल्या ६५ वर्षाच्या जीवनात भारताच्या सर्वांगीण व समतोल विकासासाठी बहुमोल योगदान दिले. स्वतंत्र भारताच्या संबंधित असलेले सर्व प्रश्न आणि समस्या यांचा जितक्या खोलवर, सर्वसमावेशक विस्तृत आणि गंभीरपणे विचार बाबासाहेबांनी केला. तसा आधुनिक भारताच्या राजकीय व सामाजिक इतिहासात फारच कमीजणांनी केल्याचे आपल्याला दिसून येते. जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेचे समुळ उच्चाटन करून भारत हे एकसंघ आधुनिक आणि समर्थ राष्ट्र निर्माण करण्याचे बाबासाहेबांचे स्वप्न होते.

हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिका संघटित व्हा आणि संघर्ष कराफ हा मूलमंत्र त्यांनी दिला. शिक्षणाशिवाय खऱ्या अर्थाने मानवाचा सर्वांगीण विकास होणार नाही. समाजात मांडलेले विचार बुद्धीच्या कसोटीवर तपासून पाहता येणार नाहीत म्हणून बुद्धीप्रामाण्यवाद्याची कास आपण धरली पाहिजे. अशी शिकवण त्यांनी दिली. आजच्या आधुनिक काळात उदयाला आलेला नवतरुण डॉ.बाबासाहेबांच्या विचारापासून बाहेर पडतोय की काय अशी भीती निर्माण होत आहे.

महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने तळागळातील बहुजन समाज आज मुख्य प्रवाहात आल्याचे सकारात्मक चित्र आहे. गौतम बुद्धांनी स्थापन केलेला बौद्ध धम्म हा विज्ञानवादी, मानवतावादी, समतावादी धम्म आहे. यांनी अखंड मानव जमातीला प्रज्ञा,शील,करुणा या तत्त्वांची शिकवण दिली. स्वातंत्र्य,समता, बंधुत्व, प्रज्ञा व मानवी मूल्ये या तत्त्वांचा पुरस्कार करायला शिकविले. यामुळेच तर आजच्या आधुनिक युगात सुद्धा काही माणसे या विचारांचा वारसा पुढे अखंडपणे नेण्याचा प्रयत्न करत आहेत आणि त्यामुळेच दीनदुबळ्यांचा उद्धार होत आहे असे म्हणता येईल.

नवीन सुधारणांच्या संदर्भात पीडित-शोषित वर्गाच्या समस्यांमागची कारणे शोधून त्यांचे निराकरण करण्यासाठी ३ एप्रिल १९२७ रोजी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले त्यातून अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले.

बाबसाहेब हे भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे खऱ्या अर्थाने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे वैचारिक उत्क्रांतीचे मानदंड आहेत.

# भारतीय लोकशाहीतील सर्वात प्रभावशाली व्यक्तिमत्व म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर

लातूर : संविधानाचे शिल्पकार म्हणून डॉ. आंबेडकरांनी भारताला एक आदर्श राज्यघटना प्रदान केली. या घटनेतून सर्व नागरिकांना समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचा अधिकार मिळाला.

त्यांनी आपल्या समाजाला ज्ञानाचे महत्व अधोरेखित केले आणि शिक्षणाच्या क्षेत्रात मोलाचे कार्य केले. आज आपल्या सर्वांवर ही जबाबदारी आहे की, डॉ. आंबेडकरांच्या स्वप्नांना आपण साकार करावे.

बाबासाहेब कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी प्रत्येकाच्या हक्कांसाठी आंदोलन केलं. सामाजिक भेदभावाविरुद्धच्या लढ्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलं. कष्टकरी, शेतकरी आणि महिलांच्या अधिकारांसाठी ते आग्रही होते. भारतीय घटनेच्या निर्मितीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. बाबासाहेब आंबेडकर ते थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंतीमहोत्सवाचे आयोजन आज दि: १४ एप्रिल २०२४ रोजी विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात करण्यात आले. या महोत्सवास अध्यक्ष म्हणून विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर चे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपप्राचार्य, कुमारस्वामी महाविद्यालय, औसा डॉ.युवराज धसवाडीकर, प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार श्री.सौदागर तांदळे, लातूर, डॉ.सारीक भालेराव, जिमखाना उपाध्यक्ष डॉ.अच्युत भरोसे, डॉ.भास्कर आगलावे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोपात डॉ.बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, वाचाल तर वाचाल हा त्यांचा विचार शिक्षण घेणाऱ्या तरुणाईला सकारात्मक दिशा देण्याचे काम करेल. कोटी कोटी अभिवादन त्या महामानवाला, ज्यांनी संविधानरुपी समतेचा अधिकार दिला. बाबासाहेबांनी प्रत्येक वर्गाला समाजात समानता मिळवून देण्याबरोबरच त्यांनी समाजसुधारणेसाठीही अनेक कामे केली. डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचे जीवन संघर्षांनी भरलेले होते. पण, ते अवघ्या जगासाठी एक मूर्तिमंत उदाहरण बनले आहेत, ज्यातून सर्वांनाच प्रेरणा मिळते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली जाते. प्रमुख अतिथी डॉ.युवराज धसवाडीकर मार्गदर्शन करताना म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उच्च विद्याविभूषित होते.

शिक्षण हे वाघीणीचं दूध आहे असं ते नेहमी म्हणायचे.शिक्षणासारखा दुसरा सर्वोत्तम गुरू नाही या मतावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ठाम होते. एखाद्या समाजाची प्रगती साध्य करायची असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असं ते म्हणायचे. मुला-मुलींना शिक्षित करा, शिका, संघटित व्हा, संघर्ष करा, आत्मविश्वास बाळगा, कधीही हार मानू नका, ही आपल्या जीवनाची पाच तत्त्वे आहेत.

यावेळी कु. शैलजा बिराजदार या विद्यार्थीनीने भीमगीत गायन केले. यानंतर १८ तास अध्ययनात सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून त्यांना गौरवण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना उपाध्यक्ष डॉ.अच्युत भरोसे यांनी. तर सूत्रसंचालन कु. प्राची पाटील व कु.शुभांगी चवळे या विद्यार्थ्यांनीने केले आणि आभार रा.से.यो कार्यक्रमधिकारी डॉ.रमेश ढवळे यांनी मानले. या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सारीक भालेराव, डॉ.महेंद्र दुधारे, डॉ. राहुल चव्हाण, डॉ.योगेश भगत, डॉ. विदया हिंगे, डॉ.मनिषा बगाडे, श्रीमती.सुरेखा आंबटवाड, श्रीमती.आश्विनी गरड, श्री.विरभद्र दुरुगकर, श्री.सुरेश बिरादार, श्री.अभिजीत देशमुख, श्री. किशोर गोडवे या कर्मचाऱ्यांनी अहोरात्र प्रयत्न केल्यामुळे कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# शिका,संघटित व्हा व संघर्ष करा हा बाबासाहेबांचा विचार आचरणात आणा- प्रा.सौ.चंद्रकला रोट्टे

मुखेड(प्रतिनीधी): आपण आज ग्रंथालय विभागाकडून महात्मा फुले,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने त्यांनी लिहिलेले व त्यांच्या विचारांच्या ग्रंथांचे प्रदर्शन भरवलात ही स्तुत्य बाब आहे.ग्रंथ प्रदर्शनाबरोबर त्यांचे विचार आचरणात आणण्याचा प्रयत्नही आपण केला पाहिजे. खरे तर फुले, शाहू,आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित होऊनच कै. कर्मवीर किशनराव राठोड, कै.आ. गोविंदराव राठोड यांनी ही शैक्षणिक संस्था उभी केली. त्यामुळे येथे वाडी तांड्यावरील मुले शिकतात. दोन्ही बंधूंचे व विद्यमान प्राचार्य डॉ.हरिदास राठोड यांचे शैक्षणिक कार्य मी जवळून पाहिले आहे. बाबासाहेबांना समाज व्यवस्थेत स्वातंत्र्य,समता व बंधुता अपेक्षित होती. त्यांना मानवधर्म हा सर्वश्रेष्ठ वाटत होता. भेदभावाला त्यांनी विरोध केला. शिक्षण घेऊन मुलींनी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व्हावे. डॉ. बाबासाहेब म्हणाले होते की शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो कोणी प्राशन करेल तो वाघासारखा गुरुगुरल्या शिवाय राहणार नाही. हे अगदी खरे आहे. मी आयुष्यात



दहावीपर्यंत बस बघीतली नव्हती पण शिक्षणामुळे स्वत:च्या पायावर उभी राहिले व त्यामुळे आजपर्यंत अर्धे जग बघून आली आहे. महाविद्यालयाने प्राचार्य साहेबांच्या नेतृत्वात ए ग्रेड मिळविला त्यांचे व कर्मचाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.संघर्षाला घाबरू नका. संघर्षातूनच जीवन उजळून निघते. बाबासाहेबांनी संविधानानुसार आपणास मतदानाचा अधिकार दिला आहे आता निवडणुका चालू आहेत. तेंव्हा मतदानाचा अधिकार वापरा. ज्यामुळे लोकशाही बळकट बनते. शिका,संघटित व्हा व संघर्ष करा हा बाबासाहेबांचा विचार आचरणात आणा असे प्रतिपादन उदगीर येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या प्रा.सौ.चंद्रकला रोट्टे यांनी ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर ता.मुखेड जि.नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने आयोजित ग्रंथ प्रदर्शन उद्घाटन प्रसंगी उद्घाटकीय भाषण देताना केले.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरिदास राठोड म्हणाले की बाबासाहेबांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने विविध उपक्रम घेण्यात येतात.त्याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम आयोजित केला आहे.समानतेचा वृक्ष महात्मा फुले यांनी लावला त्याचे संवर्धन करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. आपण ते आचरणात आणले पाहिजे. आजच्या वक्त्या चंद्रकलाताईंनी फुले,शाहू, आंबेडकरांचा वारसा डोळ्यासमोर ठेवून शिकल्या म्हणुन त्या इथपर्यंत पोहोचल्या आहेत. खरे तर अलीकडे आपण महापुरुषांचे विचार विसरत चाललो आहोत. सध्या होऊ घातलेल्या निवडणुकीत मतदान करणे हीच खरी बाबासाहेबांना श्रद्धांजली ठरेल.त्यामुळे सर्वांनी मतदान करावे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.सौ. अरुणा ईटकापल्ले यांनी करुन कार्यक्रम आयोजना पाठीमागची भुमीका विशद केली. सूत्रसंचलन ग्रंथपाल प्रा.डॉ.सूग्रीव क्षीरसागर यांनी तर आभार प्रा.डॉ. निवृत्ती नाईक यांनी मानले.

कार्यक्रमास उपप्राचार्य अरुणकुमार थोरवे, पत्रकार संदीप कामशेट्टे,प्रसिध्दी विभाग प्रमुख प्रा.डॉ.रामकृष्ण बदने, स्टाफ सेक्रेटरी प्रा.डॉ.नागोराव आवडे, सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन
## उदगीर येथील जिल्हा न्यायाधिश-१ यांचे न्यायालयात,

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११/२०२४ निशाणी क्रमांक ०७

०१. श्रीमती कल्पना भ्र. दिलीप पाटील ,वय - ४३ वर्षे, धंदा- घरकाम,
०२. कु. वैष्णवी पि. दिलीप पाटील , वय -२१ वर्षे, धंदा- शिक्षण,
०३. कु. विशाखा पि. दिलीप पाटील , वय -१८१/२ वर्षे, धंदा- शिक्षण,
०४. विघ्नेश पि. दिलीप पाटील, वय -१४ वर्षे, धंदा- शिक्षण,
अर्जदार क्रमांक ४ ची अज्ञान पालन कर्ती , सख्खी जन्मदाती आई
अर्जदार क्रमांक १, सर्व रा. तोंडार ता.उदगीर जि.लातूर

सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार ०१. श्रीमती कल्पना भ्र. दिलीप पाटील वय - ४३ वर्षे, धंदा- घरकाम, ०२. कु. वैष्णवी पि. दिलीप पाटील वय -२१ वर्षे, धंदा- शिक्षण, ०३. कु. विशाखा पि. दिलीप पाटील वय -१८१/२ वर्षे, धंदा- शिक्षण, ०४. विघ्नेश पि. दिलीप पाटील, वय -१४ वर्षे, धंदा- शिक्षण, अर्जदार क्रमांक ४ ची अज्ञान पालन कर्ती सख्खी जन्मदाती आई अर्जदार क्रमांक १ सर्व रा. तोंडार ता.उदगीर जि.लातूर येथील

०१. जमीन भुमापन क्रमांक ८८/A/३ मधिल क्षेत्र ० हे. ८२ आर ज्याची चतु:सीमा
पुर्वेस : दत्तात्रय बळवंतराव कंटे यांची जमीन
पश्चिमेस: विश्वनाथ मारोती कंटे यांची जमीन
दक्षिणेस : भिमराव बळवंतराव बिरादार यांची जमीन
उत्तरेस: दत्तात्रय बळवंतराव कंटे यांची जमीन

०२. जमीन भुमापन क्रमांक ८८/AA/१ मधिल क्षेत्र १ हे. ४४ आर ज्याची चतु:सीमा
पुर्वेस : मल्लिकार्जुन गोविंदराव कंटे यांची जमीन
पश्चिमेस: हणमंतराव बिरादार यांची जमीन
दक्षिणेस : बाबाराव रामा कंटे यांची जमीन
उत्तरेस: छाया भ्र. गुरुनाथ बिरादार यांची जमीन

०३. जमीन भुमापन क्रमांक ८९/E मधिल क्षेत्र ० हे. ८४ आर ज्याची चतु:सीमा
पुर्वेस : दत्तात्रय बसवंतराव कंटे यांची जमीन
पश्चिमेस: माधवराव ग्यानोबा बिरादार यांची जमीन
दक्षिणेस : भिमराव बसवंतराव बिरादार यांची जमीन
उत्तरेस: दत्तात्रय बसवंतराव बिरादार यांची जमीन

वरील चतु:सिमेच्या आतील जमीन/मालमत्ता विक्रीची परवानगी मिळावी म्हणून या मान्यवर न्यायालयात वरील प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

तरी, कोणास सदरहू अर्जदाराच्या अर्जासंबंधी काही उजर/हरकत/आक्षेप असतील तर त्यांनी आपली उजर/हरकत/आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रकाशित झालेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरुपात स्वतः अथवा विधीज्ञांमार्फत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त होणारे उजर/हरकत/आक्षेप ग्राहय धरले जाणार नाहीत., यांची नोंद घ्यावी. तद्नंतर अर्जदाराची बाजू ऐकून घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल.

पुढील नेमलेली तारीख १२/०६/२०२४

आज दिनांक १६.०४.२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

(बी.के.शिंदे) (एस.बी. मोरे)
व. लिपिक अधिक्षक
तदर्थ जिल्हा न्यायालय-१, उदगीर जिल्हा न्यायालय-१, उदगीर

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ४९ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार राम पि. लक्ष्मण सावंत ज्यापेक्षा वडील नामे लक्ष्मण पि. रामजी सावंत हे दिनांक २७/०३/२०२२ रोजी रा. हेळंब ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | राम पि. लक्ष्मण सावंत | ७४ | मुलगा |
| २) | शांताबाई भ्र. हणमंत तुंगे | ७६ | मुलगी |
| ३) | कलावती भ्र. तानाजी जाधव | ७२ | मुलगी |
| ४) | जयश्री भ्र. विजयकुमार बिरादार | ६५ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ०६/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २३/०४/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) शिक्का (पी.एम. नाईकवाडे)
व.लिपिक (सहा.अधिक्षक)

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.एन.जे. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २९५/२०२४ निशाणी क्रमांक ०६

ज्याअर्थी नामे Rameshwar Uttam Biradar हे दिनांक २१.१२.२०२० रोजी At. Vivekanand Hospital, Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1. Uttam S/o. Raosaheb Biradar, Age 56 yrs, Occu. Agri.
2. Ambubai W/o. Uttam Biradar, Age 53 yrs, Occu. H.H.
3. Rudraksh S/o. Rameshwar Biradar, Age 06 yrs, Occu. Education.
U.G. of Applicant No. 2 Grandmother
All R/o Loni, Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमूद १ हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1. | Uttam S/o. Raosaheb Biradar | 56 | Father |
| 2. | Ambubai W/o. Uttam Biradar | 53 | Mothter |
| 3. | Rudraksh S/o. Rameshwar Biradar | 03 | Son |

अर्जदार याने Rameshwar Uttam Biradar या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Rameshwar Uttam Biradar यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक: १६/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख: ११/०६/२०२४

आदेशावरुन

(ए.आर. गायकवाड) (एस.एम.शेटे)
कनिष्ठ लिपिक सहा.अधिक्षक,
३ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २९७/२०२४ निशाणी क्रमांक ०६

ज्याअर्थी नामे Kaushabai W/o. Janardhan Sontakke हे दिनांक ०३/०५/२०२१ रोजी General Hospital, Udgir Tq.Udgir Dist.latur येथे मयत झाले आहेत व अर्जदाराचे वडिल Janardhan Narayan Sontakke हे दिनांक १५/१२/२०२३ रोजी Spandan Hospital, Udgir येथे मयत झाले आहेत व अर्जदार
1. Smt. Kashibai W/o. Shankar Patil, Age 54 yrs, Occu. H.H.,
2. Narsing S/o. Janardhan Sontakke, Age 51 yrs, Occu. Service,
3. Sow. Panchfula W/o Ankush Jamkar, Age 48 yrs, Occu. H.H.,
4. Smt. Kanchan W/o. Sidram Jagaye, Age 54 yrs, Occu. H.H.,
5. Sow. Vidhyawati W/o. Balaji Patil, Age 42 yrs, Occu. H.H.,
R/o. Pimpari Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद ५ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1. | Smt. Kashibai W/o. Shankar Patil | 54 | Daughter |
| 2. | Narsing S/o. Janardhan Sontakke | 51 | Son |
| 3. | Sow. Panchfula W/o Ankush Jamkar | 48 | Daughter |
| 4. | Smt. Kanchan W/o. Sidram Jagaye | 45 | Daughter |
| 5. | Sow. Vidhyawati W/o. Balaji Patil | 42 | Daughter |

अर्जदार याने Kaushabai W/o. Janardhan Sontakke व Janardhan Narayan Sontakke या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निम शासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया
लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Kaushabai W/o. Janardhan Sontakke व Janardhan Narayan Sontakkeयांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक १५/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील तारीख ०९/०५/२०२४ आदेशावरुन

